
चांदोबा

ऑगस्ट १९९५



विश्व-समाचार

फ्रान्सचे नवे अध्यक्ष

मार्च १७ रोजी झाक शिराक फ्रान्सचे नवे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. दहा दिवसांपूर्वी निवडणूक झाली. या निवडणुकीत शिराक कॉन्झर्वेटिव्ह गॉलिस्ट दलाचे उमेदवार होते. त्यांनी विरोधी सोशलिस्ट लियोनेल जोस्पन यांना शेकडा ५२-४८ मतांनी पराभूत केले. चौदा वर्षे सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष शासन करीत आले. शिराकच्या विजयाने त्यांना स्वच्छंद व्हावे लागले. फ्रांकोइस मितेराँड हे दीर्घ काळ पर्यंत फ्रान्सचे अध्यक्ष राहिले. सन १९८१ व ८८ च्या निवडणुकीत त्यांनी शिराकना हारविलले होते. शारीरिक अस्वास्थ्यामुळे या वेळी त्यांनी निवडणुकीत भाग घेतला नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर (१९३९-१९४५) जनरल चार्ल्स डिगॉल फ्रान्सचे अध्यक्ष बनले. त्यांनी फ्रान्स मध्ये सुस्थिरता स्थापन करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु फ्रान्सच्या वसाहती (इंडोचीन म्हणजे आजचा व्हिएटनाम, कंबोडिया, लाओस) मुळे त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यांनी सर्वप्रथम या वसाहतीतील फ्रेंच सेना काढून घेतली. आणि त्यांना स्वातंत्र्य बहाल केले. सन १९६८ मध्ये त्यांनी अध्यक्ष-पदाचा राजीनामा दिला, तरी ही नंतर आलेल्या अध्यक्षांनी त्यांच्याच सिद्धांतांची अंमलबजावणी केली.

समाजवादी नेता मितेराँड १९८१ मध्ये फ्रान्सचे अध्यक्ष निवडले गेले. त्यावेळी फ्रान्सची आर्थिक स्थिति फार खालावलेली होती. बेकारीच्या समस्येने गंभीर रूप धारण केले होते. अशा परिस्थितीत एकाद्या समाजवादी नेत्याला अध्यक्ष म्हणून निवडणे देशाच्या हिताचे होते. आता फ्रान्सचे भविष्य उजळेल असे लोकांना वाटले. मितेराँड यांनी चौदा वर्षे शासन केल्यानंतर आता लोकांनी शिराक यांच्या हाती सत्ता सोपवली.

१९९३ मध्ये झालेल्या पार्लमेंटच्या निवडणुकीत कॉन्झर्वेटिव्ह पक्षाला अधिक मते मिळाली. गॉलिस्ट दलाचे नेता एडवर्ड बल्लादुर हे प्रधान मंत्री बनले. अल्प काळात बेकारीची समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला असे म्हणतात. पण हे सत्य नाही असे समीक्षकांचे म्हणणे आहे. बल्लादुर हे पण अध्यक्ष पदाचे उमेदवार होते. पण पहिल्याच फेरीत ते पराभूत झाले. आता आलेन ज्युपे प्रधान मंत्री बनले.

झाक शिराक हे ६२ वर्षांचे आहेत. आपल्या तीस वर्षांच्या राजनैतिक जीवनात ते दोनदा म्हणजे १९७४ ते ७६ व १९८६ ते ८८ या काळात प्रधान मंत्री झाले. यापूर्वी ते जेव्हा कृषि-मंत्री होते तेव्हा सफरचंदांच्या निर्यातीसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. यामुळे सफरचंदांच्या निर्यातीत फ्रान्सला जगात दुसरा क्रमांक मिळाला. शिराक अध्यक्ष म्हणून निवडले गेले तेव्हा ते पॅरिसचे मेयर होते. त्यांनी सफरचंदाला आपले निवडणुकीचे चिन्ह बनविले.

१० मे रोजी निवडणुकीत यशस्वी झाल्यानंतर जो विजयोत्सव साजरा झाला, त्यात जनतेने आशा व्यक्त केली की आता फ्रान्सचे भविष्य उज्ज्वल होणार. बेकारीची समस्या नष्ट करण्याचे माझे प्रमुख ध्येय आहे अशी शिराक यांनी घोषणा केली.





तडफड

कसलेही कठीण काम असले तरी सुशील ते करू शकतो, असे गावच्या लोकांचे म्हणणे होते. वेळ पडली की ते सुशीलची मदत मागायला जात.

सुशील आता पन्नास वर्षांचा झाला असला तरी त्याला वाटे की, या वयातही आपला उत्साह, शक्ती व सहनशक्ती यांत काहीही फरक पडलेला नाही. परन्तु गावचे लोक मात्र हली गावात नव्यानेच आलेल्या नागराजकडे जाऊन त्याची मदत मागू लागले होते.

या गोष्टीचे सुशीलला फार वाईट वाटले. त्याची बायको सूर्या सुशीलला म्हणाली, "गावच्या लोकांच्या मनात तुमच्याबद्दल फार आदर आहे. तुम्ही आता म्हातारे होत चालले असल्यामुळे ते तुम्हाला त्रास देऊ इच्छित नाहीत, म्हणूनच ते आजकाल आपल्या गरजा तरुण वयाच्या नागराजकडून भागवून घेत असावेत."

यावर काहीसा नाराज होत सुशील म्हणाला, "लायकीचा वयाशी काय संबंध? नागराज तरुण असेलही; पण तो जी कामं करतोय, ती माझ्यासारखी व्यवस्थित नाही करत."

केव्हातरी तिने आपल्या नवऱ्याच्या तक्रारी इतरांना सांगितल्या. ते लोक म्हणाले, "अरे, आश्चर्यच आहे! सुशील प्रथम कधी असल्या गोष्टीत लक्ष घालत नसे! आम्ही तर तेव्हाही सारीच कामं त्याला नव्हतो सांगत! माझ्याचकडे सगळ्या कामांसाठी लोक का येत नाहीत, या विचाराने तो पूर्वी कधी असा हैराण होत नसे. आता वय वाढलं आहे ना!"

लोकांचे हे विचार सुशीलला कळले, तेव्हा तर त्याला जास्तच दुःख वाटले. अखेर त्याला हे सिद्ध करायची एक संधी मिळाली.

त्या दिवशी सुशील पाटलाच्या घरासमोरच्या कट्ट्यावर काही लोकांशी गप्पा मारत बसला होता; नागराजही तेथेच होता. त्यावेळी जवळच्या गावच्या जमीनदाराच्या खजिन्याचा एक अधिकारी तेथे येऊन पोचला. त्याला पहाताच 'रामराम' करत पाटील म्हणाला, "अरे, इकडे कसे वळलात तुम्ही?"

सर्वांवरून एकवार नजर फिरवून अधिकारी पाटलाला म्हणाला, "अलिकडच्या चारपाच महिन्यात मी जमीनदाराच्या गावची लोकसंख्या, गावच्या सरहद्दी, तिथले तलाव, नाले इत्यादी परिस्थितीबद्दल नोंदी केल्या. जमीनदार नुकतेच शहरात गेले आहेत, अन् अजून ते परत येणार आहेत. ज्या ज्या गोष्टींवर मी काही प्रकाश टाकला आहे, त्यांचा जवळजवळ तीनशे पानी ग्रंथ झालाय. त्या संबंधात तुमच्या मदतीसाठी आलोय मी तुमच्याकडे."

पाटील आश्चर्य प्रकट करीत म्हणाला, "अं. सांगा बरं, काय हवंय आमच्याकडून?"

"मी ऐकलंय की तुमच्या गावात चांगली सुशिक्षित माणसं आहेत. मी ज्या ज्या विषयांबद्दल लिहिलंय, त्यात काही चुका असणं शक्य आहे. पुन्हा त्या शोधून सुधारण्यापेक्षा दुसऱ्या कोणा चांगल्या सुशिक्षित माणसानं ते काम करणं बरं होईल न? यासाठीच मला एका माणसाची गरज आहे." अधिकारी म्हणाला.

"कदाचित यासाठी योग्य असा केवळ नागराजच ठरेल. नागराज, यांना कर ना मदत. जमीनदाराला कधीही गरज पडली, तर हा मदत करू शकेल." पाटील बोलला. पण आपण जवळच असूनही पाटलाने आपल्याकडे दुर्लक्ष केले, हे पाहून सुशीलला खूपच वाईट वाटले. यापूर्वी आपण अशी खूप कामं सहज केलीयत, पण अलिकडे लोकांना आपला विसर पडतोय, आपली मदत मागितली जात नाहीय?

नागराज पाटलाला म्हणाला, "यांनी संग्रहित केलेल्या विषयांचा अभ्यास करून त्यातल्या चुका शोधायला कमीत कमी दहा दिवस तर लागतीलच. कारण यांच्या नोंदीच तीनशे पानांच्या आहेत. इतकं मोठं काम एकाच दिवसात कसं करता येईल?"

त्याच्या या बोलण्याने पाटील काहीसा निराश झालेला पाहून सुशील म्हणाला, "तुमची हरकत नसेल न पाटीलदादा,



आशा मुंढे

तर मी हे करू शकेन."

सुशीलच्या हाती आपला ग्रन्थ देत तो अधिकारी म्हणाला, "मी तुमच्याबद्दल ऐकले आहे. तुम्ही हे काम नक्कीच उत्तम प्रकारे करू शकाल. आता वृद्ध झाल्या असल्यामुळे तुम्हाला हे काम सांगायला मला संकोच वाटत होता. तुम्ही ते केलंत, तर मला फारच आनन्द वाटेल."

सुशीलने खूप मेहनत करून त्या ग्रन्थातील चुका सुधारल्या आणि एकाच दिवसात तो अधिकाऱ्याच्या हाती सोपवला.

दुसऱ्या दिवशी अधिकाऱ्याने ग्रंथ जमीनदाराला दिला. जमीनदाराने तो लक्षपूर्वक वाचला, अन् त्यात कुठेही चूक नसल्याबद्दल अधिकाऱ्याची प्रशंसाही केली. जमीनदार याबद्दल आणखीही चार दोन लोकांजवळ बोलला.

"एक दिवस! केवळ एकाच दिवसात तो पूर्ण ग्रन्थ वाचून त्यातल्या चुका मी सुधारल्या; पण मला त्यामुळे जराही थकवा वगैरे आला नाही." सुशील गावच्या लोकांजवळ बोलत राहिला.

यानन्तरही आपली योग्यता शाबित करायची संधी सुशीलला तीन-चारदा मिळाली.

एकदा पाटील आजारी पडला. वैद्याला निराळ्या प्रकारच्या काही औषधींची आवश्यकता होती. वरुणनगरच्या व्यासानंदाशिवाय दुसऱ्या कोणाकडेही त्या नव्हत्या. वैद्याने सांगितलेली रोगलक्षणं व्यासानन्दाला सांगून त्याच्याकडून त्या औषधी आणायला हव्या होत्या. पण अडचण अशी होती की व्यासानन्दाला फक्त संस्कृत भाषाच समजे अन् तोही संस्कृतच बोलत असे. नागराजला त्याच्याकडे पाठवावे, असे वैद्याच्या मनात होते. पण वरुणनगरला जायचे, म्हणजे एका खाऱ्या पाण्याच्या नाल्यातून रस्ता ओलांडणे आवश्यक होते. नागराजच्या तब्येतीला खारे पाणी सोसत नसे. अशा पाण्यातून जायचे असेल, तर एक आठवडा अगोदरपासून त्याला औषध घेणे आवश्यक असे, पथ्यपाणी संभाळणे आवश्यक असे. पण आता तेवढा वेळही नव्हता.

सुशीलला तेथे जाण्यात कसलीच अडचण नव्हती. खारे पाणी किंवा हवेचा त्याच्या तब्येतीवर काही परिणाम होत नसे, म्हणून औषधी आणायचे काम त्याने स्वतःवर घेतले अन् ते यशस्वीपणे पूर्ण ही केले.

गावातल्या लोकांनी यावर्षीची कालीमातेची पूजा विशेष थाटामाटात करायचे ठरवले. उत्सवाच्या दिवशी गावच्या सर्व पुरुषांनी देवीच्या मूर्तीसमोर दिवस भर नाचणे आवश्यक असे. कोणीही खाली बसायचे नाही असा नियम असे. गावकऱ्यांची अशी समजूत असे की, असे केल्याने गावचे भले होते; नियम न पाळला तर सर्व गावावर काही संकट कोसळते.

गावच्या जवळच्या जंगलात एक विशेष झाड असून त्याची पाने एकाच आकाराची नसत. काही पानांवर त्रिशूलाची आकृति असे. अशी एकशे सोळा पाने तोडून आणून त्यांची माळ







देवीच्या गळ्यात घालायची अन् अुत्सव संपल्याबरोबर, पाने तोडून आणणारानेच ती पुन्हा त्या झाडाच्या फांदीला लटकवायची असाही एक नियम होता.

जंगलाची ही सफर मोठी कष्टाची असे. इतकी लांब वाट तुडवून येअून अुत्सवात नाचणे व पुन्हा ती माळ परत घेअून जाणे हे मोठे दुष्कर कर्म होते. जंगलातले ते झाड शोधून त्यावरील फक्त त्रिशूळवालीच पानं तोडणं, माळ बनवणं वगैरे सर्वांनाच शक्य नसे. येरागबाळाचे काम नव्हते ते! 'आपण हे काम करू शकू' असे नागराज म्हणाला तर होता, पण 'इतकी मेहनत माझ्याच्याने होणार नाही' असेही तो म्हणाला. तो म्हणाला, "अुत्सवात दिवसभर नाचायचे असेल, अुभंच रहायचं असेल तर अगोदर आठवडाभर आराम करायला हवा; अन् तो मिळणार नसेल, तर हे काम करणं मला शक्य नाही."

सुशीलने यापूर्वी चार पाच वेळा तरी हे सर्व केले होते. तो पुन्हा ते करायला तयार झाला. तो जंगलात गेला, पाने आणली, दिवसभर नाचल्यावर माळ पुन्हा त्याने त्या झाडाला लटकावलीही. ही सारे कामे त्याने बरोबर क्रमाने व्यवस्थित पूर्ण केली. सर्वजण म्हणालेही की - इतके कठोर परिश्रम करून ही सुशील जरासुध्दा दमला नाही. सूर्याही आपल्या नवऱ्याच्या एकूण सहन-शक्तीबद्दल व अुत्साहाबद्दल खूप खुश झाली.

अशा प्रकारे सुशीलने सिद्ध केले की, अनेक बाबतीत आपणच नागराजपेक्षा अधिक योग्य आहोत. तरीही अनेक लोक अजूनही प्रमुख कामांसाठी नागराजच्याच आश्रयाला जात. अन् यामुळे सुशीलच्या मनाला ठेच लागे.

एके दिवशी सूर्या सुशीलला म्हणाली, "आरामात घरात बसून तुम्ही पौराणिक ग्रन्थ वाचत जा ना! मलाही त्यांचा अर्थ समजावून सांगत जा. दोघं मिळून सुखात राहू या. दुसरी माणसं तुम्हाला आपली कामं सांगत नाहीत, तर तुम्हाला त्रास होण्यापेक्षा आनन्द वाटायला हवा."

"हं! सर्वजण समजतात की मी आता म्हातारा झालोय. काही लोक तर तसं मला तोंडावर खुशाल सांगतात. मी काय खाटेवर पडून आहे का? आजारी आहे मी? अशक्त झालोय? जी कामं तरणीताठी पोरं करू शकत नाहीत, ती सुद्धा मी करतो, करून दाखवली ही आहेत. पण हे सत्य मानायला लोक तयार नाहीत!" सुशीलने आपल्या मनचे दुःख प्रकट केले.

एके दिवशी जवळच्या गावचा सुशीलला चांगला ओळखणारा वसुदेव त्याच्या घरी आला. त्याच्या गावी गेली दोन वर्षे पाअूस पडत नव्हता. विहिरी, तलाव वगैरे खोदावे यासाठी सर्वजण बोलत होते. पण गावचा पाटील त्याकडे मुळीच लक्ष घालत नव्हता. राजाकडे तक्रार करावी, तर त्यातही अनेक अडचणी होत्या.

तक्रार करायला जो कोणी राजधानीला जाईल, त्याने म्हणे राजवाड्यासमोर अुभे रहायचे व आपणाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी काही अवघड काम करून दाखवायचे! मग म्हणे राजा त्याला बोलावून घेअून कारण विचारणार अन् तसे झाल्यावर आपल्या येण्याचे कारण राजाला सांगायचे.

"साधारणतः सर्वजण राजधानीतल्या त्या मैदानात येतात अन् त्याच्या मध्यावर न थांबता तीन वेळा हातांवर अुलट्या सुलट्या अुड्या मारतात. असं करून दाखवण्यासारखी माणसं आमच्या गावात बरीच आहेत. पण राजाला नीटपणे आपला हेतु सांगता तर आला पाहिजे! अशी योग्यता असणारा कोणी नाही आमच्या



गावात. त्यासाठीच मी इथे आलोय या गावात. असा लायक माणूस तुझ्या ओळखीत कोणी आहे का? अशाच एकाद्या माणसाच्या शोधात आलोय मी." वसुदेवने सुशीलला विचारले.

सुशीलची योग्यता वसुदेवला चांगली माहीत होती. तरीही त्याने आपल्याकडे सरळ मदत न मागता मनची गोष्ट अुलट-सुलट फिरवून सांगितल्याबद्दल आता सुशीलला रागच आला. अन् त्याने अशा माणसासाठी गावपाटलाकडेच चौकशी करायला वसुदेवला सांगितले.

वसुदेव पाटलाकडे गेला. त्याला भेटून परत आल्यावर वसुदेव सुशीलला म्हणाला, "पाटलाने नागराज नावाच्या कोणा तरुणाचं नाव सुचवलंय. त्यानं असंही सुचवलंय

की नागराजला या कामासाठी तूच तयार करू शकशील.''

या बोलण्याने सुशील जास्तच नाराज होऊन म्हणाला, ''हूं ! जिल्ह्याच्या अधिकाऱ्यानं लिहिलेलं तीनशे पानी पुस्तक मी एका दिवसात वाचून त्याच दिवशी त्यातल्या चुकाही सुधारून दिल्या. अचानक काष्टौषधींची पाटलाला गरज पडली, तेंव्हा मीच जाऊन एका दिवसात त्या घेऊन परतही आलो. कालीमातेच्या उत्सवात कसलाही बहाणा न करता, न थकता, ओळीनं तीन दिवस न थांबता कष्ट करत राहून गावची इज्जत मीच राखली. पण आता मी इथे समोर असताना मुद्दाम मला वगळून नागराजलाच घेऊन जायचंय नं तुला ? मग जा की घेऊन. मी त्याची मनधरणी करायलाच काय, पण नुसतं त्याच्याशी बोलायलाही मुळीच तयार नाही.''

''मग तुमचा गावपाटील बोलला ते खरंच तर!'' वसुदेव आश्चर्य प्रकट करत म्हणाला.

आता अधीर होत सुशीलने विचारले, ''बोल, काय म्हणाला गावपाटील माझ्या बाबतीत?''

''तू पूर्वी जेंव्हा एखाद खूप अवघड काम करत होतास, तेंव्हा लोक तुझी वाहवा करत असत, पण तू म्हणायचास की, अरे! हे काही विशेष कठीण थोडंच आहे? पण अलिकडे मात्र जे कोणतंही काम करशील, ते 'फार कठीण आहे, पण तरीही मी करू शकलोय, मलाच फक्त ते शक्य झालंय' असं म्हणायला लागतोस. पाटील म्हणाला की, तू आता म्हातारपणात पदार्पण केलयस, तेच बरोबर आहे. या वयात तुला विश्रान्तीच घ्यायला हवी.'' वसुदेवाने त्याला सल्ला दिला.

आत्ता कुठे सुशीलच्या लक्षात आले की, आपल्यात खरोखरच बदल झालाय. नागराज यासाऱ्या गोष्टींनी त्रासत नाही. आपली शक्ती योग्यता सिद्ध करायची तडफड त्याच्या मनात नाहीय. ज्यांचे वय वाढते त्यांच्यातच ही तडफडही वाढते.

हे सत्य ओळखल्यानंतर सुशीलने आपला जीवनक्रमच बदलून टाकला, दुसऱ्यांकडून प्रशंसा व्हावी ही आशा त्याने सोडून दिली, अन् आपले जीवन सुखाने घालवू लागला.





भुवनसुंदरी - ९

(भुवनसुंदरीसाठी ग्रीक व ट्रोजन यांच्यात युद्ध झाले, अन् त्याचा शेवट जवळ आला. दोन्ही पक्षांकडील मोठमोठे योद्धे मारले गेले. ट्रॉय हस्तगत करण्यासाठी रूपधरने एक कारस्थान रचले. त्यानुसार एका कारागिराने लाकडाचा एक प्रचंड घोडा बनवला अन् योद्धे त्याच्या पोटात घुसून बसले. ग्रीकांनी घोडा आणि चोर्यनाश नावाचा एक गुप्तहेर समुद्रतटावरच राहू दिले आणि आपण जहाजातून आपल्या देशाकडे निघून जात असल्याचे नाटक केले. ट्रोजन तो घोडा नगरात घेऊन आले आणि मोठ्या उत्साहाने आपला विजयोत्सव साजरा करण्यात मग्न झाले.)

बाहेर सर्वत्र कोलाहल माजलेला होता, अन् घोड्याच्या पोटात बसलेले ग्रीक वीर मात्र भयाने कापत होते. त्यांना इतके पक्के ठाऊक होते की आपल्या इथल्या वास्तव्याचा संकेत मिळायचा अवकाश, की आपले प्राण गेलेच म्हणून समजावे. दोर्दंड शिळेसारखा गंभीरपणे बसून होता. तीक्ष्ण दृष्टीने फेकलेला खंजीर घोड्याच्या आत घुसून त्याच्या अगदी डोक्याजवळच पडला. तरीही तो जरा सुद्धा हलला नाही. तो तर बाहेर पडून शत्रूवर तुटून पडण्यासाठी अगदी अधीर झालेला होता. त्या संधीच्या प्रतीक्षेत तो तलवारीची मूठ घट्ट धरून राहून पुन्हापुन्हा रूपधरकडे पहात होता. कारण या हल्ल्याचा पुढारी रूपधरच होता, बाहेर पडायचा आदेश योग्य वेळी तोच देणार होता.

भुवनसुंदरी संध्याकाळी आपला पती अरिभयंकर याच्यासमवेत घोडा पहायला आली. नवऱ्याचे मन राखायचे नाटक करत,



घोड्याभोवती फिरत. अधून मधून त्यावर खटखट आवाज करत राहिली. आत बसलेल्या योद्धयांच्या पत्नींच्या आवाजाची नक्कल करून ती त्यांची नावे घेऊन घेऊन त्यांना हाका मारू लागली. रूपधरच्या जवळ बसलेले प्रताप व देवमय तर तावडतोब बाहेर झेप घ्यायला आसुसले, पण रूपधरने त्यांना कसेबसे आवरून धरले.

रात्र झाली. विजयोत्सवाच्या हालचालींनी दमून गेलेले ट्रोजन नागरिक गाढ झोपेत बुडाले. एकादा कुत्रासुद्धा आता भुंकत नव्हता इतकी शान्तता झाली होती. केवळ भुवनसुंदरीच काय ती जागी होती. तिच्या खोलीबाहेर आता एक गोलाकार दिवा जळत होता. ग्रीक लोकांसाठी हा एक संकेत होता.

मध्यरात्र झाली. आता चन्द्रोदयाची वेळ झाली होती. याच वेळी चौर्यनाथ हळूच मांजरपावलांनी नगराबाहेर पडला अन् त्याने वज्रकायच्या समाधीपाशी दिवा लावला. त्याच वेळी प्रत्याम्नासही एक पेटलेली मशाल हलवत होता. समुद्रात नांगरलेल्या जहाजातील सम्राटाला तो संकेत होता.

सम्राटाच्या नौकांमधले दिवे ही आता पेटवण्यात आले अन् ग्रीक नौका समुद्रकिनाऱ्याकडे निघाल्या.

सम्राटाचा संकेत मिळताच प्रत्याम्नास लाकडी घोड्याजवळ जाऊन हळूच बोलला, "सर्व जय्यत तयारी झालेली आहे." त्याबरोबर रूपधरने दोघांडला दरवाजा उघडण्याची आज्ञा दिली.

घोड्याचा दरवाजा उघडला व शिडी लावण्यापूर्वीच एका योध्द्याने अतिउत्साहाने बाहेर उडी मारली. त्या जागीच योद्धे चुपचाप एकेक करून बाहेर उतरले. समुद्रातून येणाऱ्या सैनिकांसाठी दरवाजा उघडायला त्यांच्यापैकी काही सिंहद्वाराकडे धावले; काही राजप्रासादाकडे पळाले व तेथील पहारेकऱ्यांना त्यांनी झोपेतच कापून काढले.

प्रताप केवळ भुवनसुंदरीचाच विचार करत होता. त्याचे सारे लक्ष तिच्याचकडे लागून राहिलेले होते. तो आता तिच्या महालाकडे वेड्यासारखा धावत सुटला.





सुरा खुपसला आणि त्याचा वध केला.

आतापर्यन्त तर प्रतणचा असा विचार होता की, भुवनसुन्दरी हाती लागताच तिला मारून टाकावे. परन्तु तिचे मनमोहक रूप पहाताच त्याने आपला विचार बदलला. हातातली तलवार फेकून देऊन त्याने भुवनसुन्दरीचा हात पकडला अन् तिला घेऊन तो आपल्या नौकांकडे गेला.

[illegible] ट्रोजन असूनही प्रत्याम्नासने ग्रीकांना सहाय्य केले, पण हे विसरून ग्रीकांनी त्याच्या एका मुलाला जखमी केले. त्याच्या दुसऱ्या मुलाला मारण्यासाठी ग्रीक सैनिक रस्त्यात त्याचा पाठलाग करत असताना रूपधरने ऐन वेळी तेथे पोचून सैनिकांना अडवले. नन्तर त्याने स्वतःच प्रत्याम्नासच्या घराच्या दरवाजावर एक व्याघ्रचर्म लटकावून ठेवले. 'या घरातील कोणावरही अत्याचार होऊ नये' या गोष्टीचा तो संकेत मानला जाई. अशाच प्रकारे प्रभंजनचे घर ही ग्रीक आक्रमणापासून वाचले.

ट्रॉयमधे हत्याकांड सुरू होताच वर्धनची मोठी मुलगी जातिनी ही बुद्धिमती देवीच्या मंदिरात जाऊन लपली होती. परन्तु ग्रीकांनी तिला पकडून आपल्याबरोबर नेले. ज्या ट्रोजन स्त्रिया वाचल्या होत्या त्या सगळ्या ग्रीक सैनिकांच्या अधीन झाल्या. सम्राटाने जातिनीवर आपला हक्क प्रस्थापित केला.

हत्याकांडाच्या समाप्तीनन्तर ग्रीकांनी ट्रॉय



नगर लुटले, भिंती पाडल्या, घरे जाळली, बळी दिले, अन् केलेली लूट आपसात वाटून घेतली.

वीरसिंहाच्या पत्नीला नवयोधने आपलीशी केली. तिचा जो एक लहान मुलगा होता, त्याला ग्रीकांनी कारस्थान करून मारून टाकले.

वज्रकायची प्रेयसी प्रमोदिनी हिच्या भविष्याबद्दल ग्रीकांच्यात बरेच वादविवाद झाले, दीर्घ चर्चा झाल्या. वज्रकायने मरताना आपल्या मित्रांना सांगितले होते की, ट्रॉयचे पतन झाल्यावर प्रमोदिनीला आपल्या समाधीवर बळी द्यावे. नुकताच तो आपला मुलगा व काही ग्रीक सैनिकांच्या स्वप्नात आला व त्याने या गोष्टीचा पुनरुच्चार केला. त्याने अशी धमकीही दिली की, 'तिचा बळी



दिला नाही तर ग्रीक सेना सुरक्षित स्वदेशी परतू शकणार नाही. मी स्वतःच अडचण उपस्थित करून ग्रीकांचा विध्वंस करीन!"

कांशुक म्हणाला, "वज्रकायने तनमनाने प्रमोदिनीवर प्रेम केलं. पण तिनं मात्र त्याला धोका देऊन त्याचा विनाश करवला. अशा स्थितीत वज्रकायची इच्छा पुरी न करणं म्हणजे अधर्म होईल." परन्तु सम्राटाने या गोष्टीला विरोध केला. तो म्हणाला, "आतापर्यन्त खूप रक्तपात झालेला आहे. शिवाय मेलेल्या माणसाच्या अधिकाराचा एका जिवन्त स्त्रीशी संबंध जोडणे अनुचित आहे. मला तर हे अगदी असंगत वाटतंय."

"जानिनी तुमच्या वाट्याला आलेली आहे. तिला खुश करण्यासाठी तुम्ही तिच्या बहिणीला वाचवायचा प्रयत्न करत आहात." असा काही ग्रीकांनी सम्राटावर आरोपही केला. वादविवादाने तीव्र रूप धारण केले. आता हा प्रकार आणखी वाढायला नको, म्हणून मधेच हस्तक्षेप करत रूपधरने आपला निर्णय दिला की, प्रमोदिनीला बळी दिले जावे. त्याने सम्राटालाही आग्रह केला की, इतरांच्या इच्छेप्रमाणेच कारवाई करायला हवी.

प्रमोदिनीला बळी द्यायचा निर्णय पक्का झाला. तिला घेऊन येण्याचे काम रूपधरवर सोपवले गेले. वज्रकायचा पुत्र नवयोध स्वतःच मारेकरी बनला, आणि ग्रीक सैनिकांच्या उपस्थितीत वज्रकायच्या समाधीजवळ प्रमोदिनीला बळी देण्यात आले. नंतर ग्रीकांनी तिचे अंतिम संस्कार शास्त्रोक्त पद्धतीने केले.

प्रमोदिनीचा मृत्यु होताच ग्रीकांच्या परतीसाठी अनुकूल वारे वाहू लागले. 'प्रमोदिनीच्या बळीमुळेच वज्रकायचा आत्मा शान्त होऊन त्यानेच अनुकूल हवेची योजना करून आपल्याला मदत केलीय' अशी ग्रीकांची समजूत झाली. यानंतर जराही विलंब न करता ते आपापल्या जहाजात बसून स्वदेशी जायला निघाले.

वर्धनची पत्नी रूपधरच्या वाट्याला तर आली, परन्तु ग्रीकांचे अत्याचार, अनीति वगैरे प्रकारांमुळे रागावून ती त्यांना शिव्याशाप देत राहिली. तोंडी येईल ते बोलू लागली. तिचे तोंड बंद करण्यात असफल झालेल्या सैनिकांनी शेवटी तिला मारून समुद्रात फेकून दिले.

या एकूण युद्धयात्रेत ग्रीकप्रमुखांचे अतोनात नुकसान झाले. त्यातले कित्येक तर आपल्या राज्यात परत पोचूही शकले नाहीत. ते कोठे गेले, त्यांचे काय झाले याचा पत्ता ही कोणाला लागला नाही.


ट्रॉयहून निघण्यापूर्वी सम्राट व त्याचा भाऊ प्रताप या दोघात भांडण झाले. प्रतापचे म्हणणे असे की, "आता हवा अनुकूल आहे, तर परतीची तयारी तावडतोब करावी." पण सम्राट म्हणाला, "बुद्धिमतीदेवीला भेटी अर्पण केल्यावाचून निघणे उचित होईल का?" प्रताप म्हणाला, "बुद्धिमतीदेवीने आपल्याला अशी काय मदत केली, की तिला आपण भेटी अर्पण कराव्या ? बळी द्यावे ? तिनं तर शत्रुपक्षालाच मदत केली. जिने आपल्याला काही मदत केली नाही, तिला आपण काही भेटी देण्याची निदान मला तरी आवश्यकता वाटत नाही." या बाबीवरून खूप वादविवाद झाला, दोघेही नाराज होऊन एकमेकांपासून दूर झाले. पुढे आयुष्यभर ते भेटले नाहीत.

सम्राट, नवयोध, वृद्ध नवद्योत सरळ आपापल्या घरी गेले. पण हवेने योग्य साथ न दिल्याने प्रतापची बरीचशी जहाजे बुडाली. तो स्वतः इजिप्तला पोचला. तेथून तो घरी पोचण्यापूर्वीच कोणी तरी सम्राटाची हत्या केली.

ट्रॉय युद्धाच्या शेवटच्या भागात लाकडी घोड्याची योजना करून सफलता प्राप्त करून घ्यायचे श्रेय रूपधरकडेच जाते. ट्रॉयचा पराभव करण्यात तोच प्रमुख होता. अशा या रूपधरला घरी पोचायला तब्बल दहा वर्षे लागली! त्याचा प्रवास फारच विचित्रपणे झाला.

अशा प्रकारे ट्रॉयचे पतन झाले. ग्रीकांनी विध्वंस करण्यापूर्वी ते जगातल्या सुन्दर नगरांपैकी एक होते. या नाशानन्तर कित्येक राजे व प्रशासनच्या वंशजांनी त्याची पुनर्निर्मिती केली, परन्तु त्याला आपले पूर्ववैभव कधीच प्राप्त झाले नाही.


(समाप्त)



चान्दोबाच्या बातम्या

चौदा वर्षे दुचाकी भ्रमण

ताहेर मद्रासवाला हा अहमदाबादचा रहिवासी. १९८१ मध्ये त्याच्या आईवडलांनी त्याला सहा महिने सायकल प्रवास करण्याची परवानगी दिली. त्यावेळी ताहेरचे वय अठरा वर्षांचे होते. पण तो सहा महिन्यानंतर घरी परतला नाही. त्याने आपला हा प्रवास चौदा वर्षे चालूच ठेवला.



११६,००० कि.मी. इतका हा प्रवास त्याने सायकलवरच केला. या दरम्यान त्याने तीस देशांना भेटी दिल्या. त्याने केवळ सायकलप्रवासच केला असे नाही, तर या साऱ्या देशांची वैशिष्ट्ये जाणून घेतली, संग्रह केला. निरनिराळे फोटोही काढले. ज्या ज्या देशात तो गेला तेथल्या लोकांबरोबरच्या भेटींचा व्हिडिओही तयार केला. यामध्ये त्याचे सारे प्रवासवर्णन समाविष्ट आहे. आपले अनुभव इतरांना सांगायचे किंवा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करायचे झाले, तर या व्हिडिओ चित्रांचा त्याला उत्तम उपयोग होऊ शकेल.

चांदीचे बायबल

स्टोकहोम मधील उप्पसाला विश्वविद्यालयाच्या संपत्तिसभान असलेल्या बायबल ग्रंथाची दोन पाने व वरील मुखपृष्ठ गेल्या पाच एप्रिलपासून नाहीशी झाली होती. एक महिन्यानन्तर ही पाने स्टोकहोमच्या प्रमुख रेल्वे स्टेशनच्या डाकर्समध्ये सुरक्षित असल्याबद्दल कोणीसे टेलिफोनवरून कळवले. वास्तविक ही पाने सुप्रसिद्ध चांदीच्या बायबलमधील आहेत. सहाव्या शतकाच्या या पवित्र ग्रंथातील अक्षरे चांदीच्या शाईने लिहिलेली असून काही अक्षरे व पानांच्या कोपऱ्यासाठी सोन्याचा ही उपयोग केला गेलेला आहे. असे म्हटले जाते की, स्वीडनच्या सैनिकांनी सतराव्या शतकात हा ग्रन्थ प्राग (झेकोस्लोव्हाकिया) हून चोरून आणला. गोथिक भाषेत लिहिलेला हा अद्भुत ग्रंथ आज ही स्वीडनमध्येच आहे.

चार वर्षांच्या बालकाचे साहस

मे १९ ला सनी कनोडिया याने मुंबईतील गल्ली गल्लींतून कार चालवून दाखवली. यापूर्वी त्याने कलकत्त्याला कार चालवली होती. अन् त्याही पूर्वी अहमदाबाद, गोहाटी, सुरत इत्यादी शहरांतील रस्त्यांवरून कार चालवून लोकांना अचंबित केले होते. कनोडिया अजूनही नर्सरी वर्गात शिकत असून तो केवळ पाच वर्षांचा आहे. हैद्राबादच्या जुही भटनागरने चार वर्षांची असतानाच कार चालवली होती. ही गोष्ट सनीच्या माता-पित्यांनी त्याला सांगितली. तेव्हा त्याने विचारले, "हे मलाही शक्य होणार नाही का?"



अन् हट्ट करून त्याने आपल्या पित्याकडून ड्रायव्हिंग शिकून घेतले. अनेक नगरांतून कार चालवून त्याने नवीन रेकॉर्ड प्रस्थापित केले. त्याचे नाव गिनीज रेकॉर्ड बुकमध्ये दाखल होणार आहे.



योग्य अभिलाषा

विक्रमादित्य हट्टी होता. पुन्हा झाडावर चढून त्याने प्रेत खाली उतरवले. प्रेत आपल्या खांद्यावर टाकून विक्रमादित्य चालू लागला तेव्हा वेताळ बोलू लागला –

"राजा, एखाद्या मांत्रिकाला भेटून त्याच्याकडून अद्भुत शक्ति प्राप्त करून घेण्यासाठी जर तू हे कठोर परिश्रम करीत असशील, तर मात्र शेवटी निराशाच तुझ्या पदरी पडेल. तुला सावध करण्यासाठी मतंग नावाच्या एका मुनीची गोष्ट मी तुला सांगतो." आणि वेताळ राजाला मतंग मुनींची कथा सांगू लागला.

एका गावी एक श्रीमान् माणूस रहात होता. त्याचं नाव होतं नवनीत. हळूहळू त्याची सर्व संपत्ति संपुष्टात आली. नवनीतचा मुलगा सीताराम एकवीस वर्षांचा होईपर्यंत केवळ घर तेवढं शिल्लक राहिलं. खाटेवर पडल्या पडल्या त्याने आपल्या मुलाला जवळ

वेताळ-कथा



बोलावलं नि म्हणाला - "सीताराम, आपली परिस्थिति फार बिकट झाली आहे. आज रथ-सप्तमीच्या दिवशी मी तुला एक रहस्य सांगणार आहे. जा, स्नान करून स्वच्छ होऊन माझ्यापाशी ये".

सीताराम स्नान करायला निघाला. मध्यंतरीच्या काळात नवनीतला मृत्यु आला.

नवनीतने ज्यांच्याकडून कर्जे घेतली होती, त्या सर्वांची दुसऱ्याच दिवशी सीतारामकडे गर्दी जमली. ते म्हणाले की रथ-सप्तमीच्या दुसऱ्या दिवशी मुलगा कर्ज चुकवील असे नवनीतने त्यांना आश्वासन दिले होते. सर्वांनी सीतारामकडे आपापले मुद्दल व व्याजाच्या पैशांची जोरदार मागणी केली.

सीताराम त्या सर्वांना म्हणाला की [illegible] सांगणार होते, पण त्यापूर्वीच त्यांचा अंत झाला. पण कर्जदारांना हे [illegible] खूपच तमाशा केला.

कर्जदारांमध्ये एक माणूस होता रमण. नवनीतने त्याच्याकडे आपलं घर गहाण टाकले होते. त्याने सर्वांना सांगितलं, "तुमच्या रकमा फार लहान आहेत. मी आतल्या सामानासह या घराचा कब्जा घेईन आणि तुमच्या रकमा देऊन टाकीन."

रमण सीतारामला म्हणाला, "मी तुला एक दिवसाची मुदत देतो. उद्या सकाळी तुला [illegible] हे [illegible] सांगायला हवं."

सर्व लोक गेल्यावर सीतारामला आई रजनी म्हणाली, "बाबा आपली गृहदशा काही ठीक नव्हती. [illegible] आजच्या वाडवडिलांपासून मिळालेली एक जुनी लाकडी पेटी आहे. ती आपण बरोबर घेऊन जाऊ."

सीतारामने [illegible] एका जुन्या पुस्तकाशिवाय त्या पेटीत काही सापडले नाही.

अत्यंत [illegible] त्या पुस्तकात त्यांच्या वंशाचा इतिहास होता. सीतारामच्या जन्मापर्यंतचं विवरण त्यात होतं. त्यानंतरच्या एका पानावर लिहिले होते, "बादरायण, बादरायण, बादरायण या नाम मंत्राचा तीन वेळा जप केला की समोर उभा असलेला शत्रू ही मित्र बनतो. या परिवारातील प्रत्येकाला या मंत्राचा फायदा होईल."

याशिवाय या पुस्तकात काही लिहिलेलं नव्हतं. पण एक सावधगिरीची सूचना होती की या बादरायण मंत्राबद्दल मृत्यूच्या वेळेपर्यंत कोणाला काही सांगू नये. मृत्यु समयी वडील जे सांगू इच्छित होते ते आता सीतारामला कळले. तो माळ्यावरून खाली उतरला नि मोठ्या उत्साहाने रमणच्या घरी गेला. त्याच्या जवळ जाण्यापूर्वी त्याने मनातल्या मनात तीन वेळा बादरायण मंत्राचा जप केला.

रमण मोठ्या प्रेमाने त्याला भेटला आणि म्हणाला, "तुझे वडील खरोखरीच सत्पुरुष होते. माझ्याकडून जमेल ती मदत मी तुला करीन."

सीतारामने विनंती केली - "या कर्जदारांनी मला सळो की पळो करून सोडलं आहे. माझी कर्जे तेवढी फेडून टाका."

"परमेश्वर कृपेने माझ्यापाशी खूप धन आहे. म्हणून माझं कर्ज तुला इतक्यात देण्याची जरूर नाही. तुझी लहान सहान कर्जे मी फेडून टाकतो." रमणने आश्वासन दिले.

आणि दिलेल्या शब्दाला तो जागला ही.

रजनीच्या लक्षात आले नाही की रमण मध्ये अकस्मात असा बदल कसा घडून आला? सीतारामने आईला यामागील रहस्य काही




सांगितले नाही.

आता सीतारामचं घर सुरक्षित राहिलं. देणेकऱ्यांच्या ससेमिऱ्यातून तो मुक्त झाला. सीताराम दुकानदार मदनकडे गेला. तीन वेळा त्याने बादरायण मंत्राचा जप केला. तुला पाहिजे तो सर्व माल मी फुकट पाठवीन असे मदनने त्याला वचन दिले.

आणि दिलेल्या शब्दाला तो जागला ही.

अशा रीतीने काही दिवस गेले. एक दिवशी रात्री चोरांनी सीतारामच्या घरात प्रवेश केला. त्यांची चाहूल लागताच आई नि मुलगा दोघे ही जागे झाले. चोरांनी सुऱ्या दाखवून दोघांना घाबरवून सोडलं. सीतारामने मनातल्या मनात बादरायण मंत्राचा जप



केला.

त्याच वेळी चोराने निवेदन केले - "या जगात माझं असं कोणी नाही. आजपासून मी चोरी करण्याचं काम सोडून दिलं. काही खरं काम करून आपलं पोट भरीन." आणि चोर निघून गेले.

रजनीने सीतारामला विचारले - "सगळंच काही विचित्र घडतंय नाही. सगळे लोक आपल्याला मदत कशासाठी करं करताहेत ? तुला एखादा वशीकरण मंत्र तर सापडला नाही ना ?"

"नाही आई, माझ्याजवळ तर असा काही मंत्र बिंत्र नाही. माझ्या स्वर्गीय पित्याचा आत्मा आपल्याला मदत करीत असावा असं मला वाटतंय." सीतारामने आईला समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला.

सीताराम व त्याच्या आईचे दिवस आरामात जाऊ लागले. कोणाकडून मदत पाहिजे असली की सीताराम बादरायण मंत्राचा जप करी, आणि आपले काम साधून घेई. आश्चर्य करीत सर्व लोक म्हणत की लाडकाल गावच्या पाटलापेक्षा लोक सीतारामलाच अधिक मान देतात.

एक दिवशी मतंग नावाचा एक तांत्रिक त्या गावात आला. त्याच्या जवळ मोठ्या महिमावान शक्ति होत्या. गावातील कित्येक लोकांचे रोग त्याने बरे केले. काही लोकांनी त्याच्याकडून वरदान मागितले. तांत्रिक मतंगला सर्व काही साध्य आहे, कोणतं ही असे काम नाही, जे त्याला असाध्य आहे असं गावचे लोक म्हणू लागले.

सीतारामला मतंगच्या अद्भुत शक्तींबद्दल समजले. बादरायण मंत्राचा जप करून जर तांत्रिकाला वश करून घेतले, तर मला ही असाध्य असं काही राहणार नाही असा सीतारामने विचार केला. म्हणून एक दिवशी तो मुनि मतंगला भेटला व त्याने बादरायण मंत्र जपला.

मतंगाने प्रसन्न अंतःकरणाने सीतारामकडे पाहिले आणि म्हणाला - "तू तर मोठा भाग्यवान आहेस. माझ्या मदतीची तुला काय आवश्यकता ?"

"स्वामीजी, अनेक सामान्य माणसं मला मदत करीत आहेत. माझ्या सर्व आवश्यकतांची सहज पूर्ति होत आहे. माझ्या सामान्य इच्छा तर पूर्ण होतात. आपण माझ्यावर कृपा केली तर माझ्या असाधारण इच्छा सुद्धा पुऱ्या होतील." सीताराम दोन्ही हात जोडून नम्रपणे म्हणाला.

मतंग हसत म्हणाला - "माझी गोष्ट पण ऐकून घे बेटा." आणि तो आपली गोष्ट सांगू लागला.

"मी विश्व सम्राट बनू इच्छित होतो. हिमालय पर्वतावर जाऊन मी घोर तपस्या केली. काही वर्षांनी परमेश्वर माझ्यावर प्रसन्न झाला. मी आपली इच्छा त्याच्यापुढं व्यक्त केली.

परमेश्वर म्हणाला - 'सध्या असलेला सम्राट फार चांगला माणूस आहे. तो आपल्या पदाला निःसंशय योग्य आहे. तू सम्राट होण्याची इच्छा करणं मला न्यायोचित वाटत नाही."

"मी पण एक चांगला माणूस आहे. सम्राट बनण्याची योग्यता माझ्यात ही आहे." मी आपला विचार सांगितला.

"तू चांगला माणूस आहेस हे कशावरून ? सम्राट बनण्यासाठी तू तपस्या केलीस. तप करणं हा सम्राट बनण्याचा मार्ग नाही. आपल्या शक्ति सामर्थ्याच्या बळावरच कोणी त्या पदाला योग्य बनू शकतो. तपश्चर्या करून



सम्राट बनण्याचा तुझा मार्ग चुकीचा आहे." परमेश्वराने मला मार्गदर्शनाची सूचना दिली.

तेव्हा मी विचारले - "मग माझ्या या तपस्येचं फळ काय?"

"या तपश्चर्येमुळेच जर तुला कितीतरी अद्भुत शक्ति प्राप्त झालेल्या आहेत!" परमेश्वर म्हणाला.

"तर मग या अद्भुत शक्तींचा उपयोग करून मी सम्राट होऊ शकेन!" मी आपला तर्क सादर केला.

"माणसाने आपल्या शक्तींचा उपयोग आपल्या आवश्यकता पूर्ण करण्या इतकाच करावा. त्याहून जास्त या शक्तींचा उपयोग केल्यास केव्हां ना केव्हां तरी त्याला एकाचे



द्दा फेडावे लागतील कोणी आपल्या उपयोगी पडला तर आपण त्याला मदत अवश्य करावी. असं न केलं, तर आपल्याला जे मिळालं, त्याच्या दस पट परत द्यावे लागेल. आपलंच नुकसान होईल. मी ज्या ज्या ऋषींना वर दिले ते सर्व महान बनले. राक्षसांनी अन्याय व अत्याचार करून आपला सर्वनाश करून घेतला. तपस्या स्वार्थासाठी करायची नसते, तर परमेश्वर प्राप्तीसाठी ही महत्त्वाची गोष्ट तू कधी ही विसरू नकोस." परमेश्वराने मला उपदेश केला.

परमेश्वराच्या या उपदेशामुळे माझे डोळे उघडले. परमेश्वराने मला आपल्यात सामावून घ्यावे अशी मी त्याला प्रार्थना केली.

"प्रत्येक माणसाच्या जन्माचा काही ना काही तरी उद्देश असतो. तू आतापर्यंत काहीच सत्कार्य केले नाहीस. तू जेव्हा काही सत्कार्य करशील, तुझ्या जीवनाचा उद्देश सफल करशील, तेव्हा मी तुला आपल्यात समाविष्ट करून घेईन." असे सांगून परमेश्वर अंतर्धान पावला.

त्या दिवसापासून मी गावो गाव हिंडून मानव सेवा करीत आहे.

आपण किती चुका केल्या आहेत हे मतंगची गोष्ट ऐकून आता सीतारामच्या लक्षात आले. आपल्या बादरायण मंत्राचा जप करून त्याने कित्येक लोकांकडून मदत मिळविली होती. याप्रमाणेच त्याच्या वडिलांनी ही या मंत्राच्या साहाय्याने पुष्कळ काही मिळवले होतं. अधिक लोभाला बळी पडून आवश्यकतेहून अधिक बरंच मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. मिळवलेले सर्व परत करण्याची वेळ आली तेव्हा वार्धक्याने त्यांना ग्रासले. जवळ असलेले सर्व संपुष्टात आले. म्हणून मरते वेळी त्यांनी मला सांगितले. "अति लोभामुळे माझी अशी दुर्गति झाली. मी लोकांकडून आवश्यकतेहून अधिक मदत घेतली." सीताराम विचार करू लागला. "मी असेच करीत राहिलो, तर माझी ही परिस्थिति वडिलांसारखी व्हायला वेळ लागणार नाही. मरण्याच्या वेळी मी आपल्या मुलाला 'बादरायण' मंत्र देऊ शकणार नाही आणि त्याला सावध ही करू शकणार नाही." विचारात पडलेल्या सीतारामकडे मतंगने तीव्र दृष्टीने पाहिले नि म्हणाला - "बेटा, तुझ्यात वशीकरणाची शक्ति आहे. माझ्याकडून काही मदत माग. तुला काही तरी दिल्याशिवाय मी इथून जाऊ शकणार नाही. तुझी काही इच्छा असली तर सांग, मी ती पूर्ण करीन."

मनातल्या मनात सीतारामने विचार केला आणि म्हणाला. "मुनिवर, सम्राट बनण्याची इच्छा मनात ठेवून आपण तपस्या केलीत. त्या तपस्येच्या बळावर आपल्याला काही अद्भुत शक्ति मिळाल्या व त्यांच्या साहाय्याने आपण मानव सेवा करीत आहात. आपण ती सेवा करीत आलात, त्यामुळे आपणास सम्राट बनण्याची योग्यता प्राप्त झाली आणि आता आपली सम्राट बनण्याची इच्छा नाहीशी झाली."

मतंग म्हणाला, "हाय."

"मुनिवर, माझी सम्राट बनण्याची महत्त्वाकांक्षा नाही. मला फक्त या देशाचा राजा बनवा, बस!" सीतारामने आपली इच्छा प्रदर्शित केली.

"परमेश्वराने तुला सावधगिरीची सूचना दिली होती. ती विसरलास वाटते?" मतंगने विचारले.

"नाही स्वामी, राजाला पदच्युत



करण्याची माझी इच्छा नाही. राजाला मुलगा नाही. राजाला एकुलती एक मुलगी आहे. राजा तिच्यासाठी सुयोग्य वर शोधत आहे. राजकुमारीशी विवाह करण्याची पात्रता माझ्यात यावी आणि स्वयंवरात तिने मला पसंत करावे असा मला वर द्या." सीतारामने निवेदन केले.

"तथास्तु! आता तुझे एकच ध्येय आहे. राजा बनण्याचे! तुझी इच्छा पूर्ण करून मी आता परमेश्वरात लीन होऊ शकतो." मतंग म्हणाला.

विक्रमादित्याला इतकी गोष्ट ऐकवून आता वेताळ म्हणाला. "राजा, मतंग मुनीने तपस्या करून ज्या अद्भुत शक्ति मिळविल्या,

त्याचा उपयोग करून सीतारामला राजा बनण्याचा वर दिला. मला वाटते हा मतंगचा निर्णय अयोग्य व विवेकशून्य होय. सीताराम आपल्या नारायण मंत्राच्या साहाय्याने आपल्या सर्व इच्छा पुऱ्या करीत आहे. असा स्वार्थी माणूस राजा बनून देशाचे काय कल्याण करणार? राज्यात अनागोंदी माजणार. जनता दुःख सागरात बुडून जाणार! तपोधन मुनि मतंगच्या लक्षात ही गोष्ट कशी आली नाही? परमेश्वरात लीन व्हायला निघालेल्या मुनि मतंगला मनुष्याच्या स्वार्थी स्वभावाचा कसा विसर पडला? सीतारामचं जीवन दुसऱ्या लोकांच्या दयेवर अवलंबून होतं, तो स्वतः काही परिश्रम करीत नव्हता. तो आळशी होता, स्वार्थी होता, तरी सुद्धा मुनीने त्याला वर देण्याची चूक कशी केली? याचे कारण काय असू शकेल? माहीत असून ही माझ्या या शंकेचे निवारण तू केले नाहीस तर तुझे शिर धडावर राहणार नाही हे तू जाणतोसच!"

राजा विक्रमादित्याने निवेदन केले -

"सीताराम स्वतः काही काम करीत नाही, तो मंत्राच्या बळावर लोकांकडून साहाय्य मिळवतो हे मतंगला माहीत होतं. असं करणं हे पाप आहे हे सीतारामला समजावं म्हणूनच त्याने त्याला आपली कथा ऐकवली. त्या समयी आपल्या वडिलांची दुरवस्था का झाली तसेच मतंगच्या अनुभवांचे सार जाणून सीताराम मध्ये योग्य तो बदल झाला. आता पर्यंत ज्या ज्या लोकांकडून त्याने मदत घेतली होती, ती सर्व परत करण्यासाठी जवळ पुरेसे धन असणे आवश्यक होते. सीताराम राजा झाला तरच हे सहज जमणार होते. म्हणूनच त्याची राजा बनण्याची इच्छा होती. मतंगने सीतारामची ही इच्छा जाणूनच त्याला वरदान दिले. म्हणून मी असे निश्चितपणे म्हणतो की मतंगने दिलेले वरदान योग्यच आहे. यात अविवेक नाही."

अशा रीतीने राजाचा मौन भंग झाल्यावर वेताळ अदृश्य झाला व पुन्हा झाडावर जाऊन बसला.

आधार- सत्यभामा नाईकी एक कथा



आपल्या देशातील किल्ले - ५

मध्यभारतीय किल्ले


लेखिका [illegible] ◆ चित्रकार [illegible]

[illegible]

[illegible]



मांडू



[illegible] येथे सात महिने राहिला होता. त्याने येथे आपली बेगम नूरजहाँ हिच्यासाठी ?५८ पायऱ्या असलेला महाल बनवला. महाल-प्रवेशाच्या वेळी ती जसजशा पायऱ्या चढत गेली, तसतसा प्रत्येक पुढच्या पायरीवर [illegible] ठेवण्यात आल्या.


सन ५२५ मध्ये सूरजसेनने [illegible] ग्वाल्हेर किल्ला बांधला. एका बाजूने सरळ उभा कडा व वरून सपाट असलेल्या एका टेकडीवर हा किल्ला बसलेला आहे. तोमर राजांच्या राजवटीत (१४८८-१५१८) याचे वैभव वर्णनातीत होते.

तोमर राजांपैकी प्रसिद्ध राजा मानसिंग याने प्रेम मानमंदिर बांधले. या



मानमंदिर, ग्वाल्हेर

किल्ल्याच्या चार दरवाज्यांपैकी दोन [illegible] [illegible] आहेत. [illegible] [illegible] संगीत व [illegible] [illegible] [illegible] तानसेन [illegible] [illegible] [illegible] [illegible] सुप्रसिद्ध शिष्य [illegible] [illegible] [illegible] येथेच [illegible]



▲ स्व. [illegible]ची समाधी

▲ आदिनाथ मूर्ति


[illegible] [illegible] [illegible] असे संबोधले जाते.

गुंफेही द्वारा [illegible] जैन तीर्थंकरांच्या विराट मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यातील आदिनाथ मूर्ति ५८ फूट उंच आहे.

१८५७ मधे [illegible] [illegible] [illegible] [illegible] शिपायांनीही महत्त्वाचे कार्य केले. [illegible] ते झाशी राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांना मिळाले. [illegible] १८५८ मधे या दोघांनी ग्वाल्हेर जिंकले आणि शिंदिया राजाला बाहेर हाकलले. तो इंग्रजांना मिळालेला होता. परंतु नंतर सर ह्यु रोज आपले सैन्य घेऊन त्यांच्यावर तुटून पडला. पुन्हा १८५८ मधे हे युद्ध झाले आणि त्यात १७ जून रोजी राणी लक्ष्मीबाईंचे निधन झाले. तिच्या शरीरावर जेथे अग्निसंस्कार झाला, त्या जागी आजही तिची समाधी आहे.



मध्यप्रदेशातील [illegible] रोहतासगड, कालिंजर किल्ला हे अजेय व अभेद्य मानले जात. परन्तु शेरखान (शेरशाह सूर)



चुनारगड

[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] तो किल्ला ताब्यात घेतला.

चुनारगड सरोवर [illegible] [illegible] [illegible] होता. १५३८ मधे हुमायूनने तो आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे शेरशहा [illegible] [illegible] त्यांच्या [illegible] होता. त्यासाठी त्याने एक उपाय योजला. [illegible] [illegible] [illegible] [illegible] आश्रय मागितला. राजपूत [illegible] त्याला [illegible] दिली. सातशे पालख्या [illegible] [illegible] [illegible] [illegible] पाहिल्या. त्यात फक्त म्हाताऱ्या [illegible] आढळल्यामुळे बाकीच्या पालख्या त्यांनी न तपासताच आत येऊ दिल्या. आणि [illegible] [illegible] [illegible] पालख्यांतून [illegible] सैनिक बाहेर पडले. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] किल्ल्याबाहेर [illegible] अशा प्रकारे [illegible] [illegible] अभेद्य असा रोहतासगड शेरशहाच्या हाती आला.

देवकीनन्दन खत्रीने 'चन्द्रकान्ता', 'भूतनाथ', 'कुसुमकुमारी' नावाच्या

रोहतासगड



याने तीन निरनिराळ्या पद्धतींनी हे तीन [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] आहे. आध्यासारखा आणि [illegible] आहे. त्यामुळे तो शत्रूला अभेद्य आहे. १५६१ मधे शेरशहाने [illegible] [illegible] [illegible] [illegible] बेगम [illegible] [illegible]

[illegible]

[illegible] किल्ला

[illegible] इ.स. [illegible] रात्री [illegible] सैन्याने [illegible] किल्ल्याच्या दरवाजावर [illegible] आला, व [illegible] [illegible] तेथे [illegible] [illegible] परंतु [illegible] शेरशहा [illegible] गेला व त्याचा [illegible]

[illegible] किल्ला [illegible] अकबर [illegible] किल्ल्याची [illegible] किल्ला बांधायला [illegible] लागला [illegible]

[illegible] किल्ल्यात [illegible] पैकीच त्यांनी त्याची पुनिर्मांडणी केली.

[illegible] किल्ला

भास्कर कवि होता. त्याची फार इच्छा होती की राजाने एकदा आपला सन्मान करावा, म्हणून त्याने आपल्या देशाच्या राजा चन्द्रभान याच्यावर प्रशंसात्मक एका महाकाव्याची रचना केली. पण राजाला हे काव्य कसं ऐकवावं हे काही त्याच्या लक्षात येईना. म्हणून तो आपल्या गावाच्या ग्रामाधिकाऱ्याकडे सल्ला मसलतीसाठी गेला.

ग्रामाधिकारी म्हणाला - "मी तेव्हा काही कामासाठी राजधानीत जातो, तेव्हा खुद्द राजाला भेटायची कधी वेळच येत नाही. दरबारातील एखाद्या कवीच्या मदतीने तुझे काम होऊ शकेल."

भास्कर आपले काव्य घेऊन तात्काळ राजधानीकडे निघाला. जंगलात एका लुटारूने त्याला थांबवले आणि दरडावले - "तुझ्यापाशी जे काही आहे, ते सगळं मला देऊन टाक."

भास्कर गयावया करीत म्हणाला - "माझ्या जवळ तर आता काहीच नाही. माझं काव्य ऐकून राजा प्रसन्न झाला व त्याने मला काही धन दिलं, तर त्यातला काही भाग मी तुला जरूर देईन!"

आश्चर्यचकित होऊन चोर म्हणाला - "तू कवि आहेस? मग तर आमच्या गुरूला तुला भेटलंच पाहिजे, ते कवींवर फार प्रेम करतात. चल." असे म्हणत त्याने भास्करच्या डोळ्यावर एक पट्टी बांधली. एका ठिकाणी पोचल्यावर त्याने पट्टी सोडून टाकली.

डोळे उघडताच भास्करच्या लक्षात आले की आपण पर्वताने वेढलेल्या एका महालात आहोत. कित्येक चोर आणि कसाई आपल्या कामात तिथे मग्न होते. त्यांच्या गुरूने सफेद रेशमी कपडे परिधान केलेले होते. चोराने त्यांना भास्कर बाबत सांगितले.

गुरुजी भास्करला म्हणाले - "माझं नाव

सुभाष दळवी



विद्याधर मला कविता फार आवडते. कविता करण्यासाठी या जंगलातील वातावरण फार अनुकूल आहे. येथील निसर्गरम्य वातावरणात तू राहून पाहशील, येथील निसर्गाच्या सान्निध्यात स्फुरलेली कविता अधिकच प्रभावशाली बनते. म्हणून मी म्हणतो तू इथेच रहा माझ्याजवळ."

"राजाने माझा सन्मान करावा अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे," भास्कर म्हणाला.

विद्याधर गंभीर होऊन म्हणाला - "राजाकडून सन्मान? कवीला असली इच्छा शोभत नाही. राजे लोक कवींकडून कोण जाणे कोणकोणती कामे करून घेतात."

"आपण स्वतः तर रोज दरबारामध्ये राहायला आणि राजांची आलोचना करता हे तर अगदीच हास्यास्पद आहे." भास्करने आपला विचार निर्भयपणे सांगितला.

विद्याधर म्हणाला - "माझ्या बरोबर जे लोक राहतात, त्यांच्याबद्दल तुला काही माहीत नाही, असं दिसतय. लवकरच वस्तुस्थिति तुझ्या लक्षात येईल."

अंधार पडल्यावर विद्याधरने तेथीलच सर्व लोकांना भागवताचा काही भाग वाचून दाखवला. मधून मधून त्याने भाष्य ही केले. त्यांनी काही शंका विचारल्या, त्यांचे समाधान केले.

भास्करने हे सर्व पहात रात्रीला. तेथील लोकात 'विशेष' असं त्याला काही दिसले नाही. त्यांच्यात विद्याधर म्हणजे वासरात लंगडी गाय. म्हणूनच तिथे त्याचा दबदबा होता. म्हणूनच तो आपल्या निवास स्थानाला स्वर्ग समजत होता.

त्या रात्री भास्कर खूप झोपला आणि दुसऱ्या दिवशी राजधानीकडे निघाला. विद्याधर समजावणीच्या सुरात म्हणाला - "मी तुला पुन्हा सांगतो. असं इथले तुला अन्यत्र मिळणार नाहीत. राजाकडे जाऊन शेवटी तुला काय मिळणार आहे?"

काही असले तरी विद्याधरच्या घरी राहण्याची भास्करची इच्छा नव्हती. तेव्हा विद्याधरने त्याला सांगितले - "या जंगला पलीकडे एक नादपूर नावाचं गाव आहे. तिथे माझा शिष्य वल्लभ राहतो. तो महाकवि आहे. त्याला भेटलास तर तो तुला काही सुचवील."

भास्कर नादपूरला पोचला. बऱ्याच लोकांना त्याने वल्लभ बद्दल विचारले. शेवटी त्याने एका धनगराला वल्लभ बाबत विचारले.

"माझंच नाव वल्लभ! तुझं माझ्याशी काय काम?" धनगराने विचारलं.

"विद्याधरने तुम्हाला पाठवलय? ते कसे काय आहेत? त्यांनी अलीकडे कुठल्या नवीन काव्याची रचना केलीय?" वल्लभने आतुरतेने विचारले.


"विद्याधर काव्य-रचना करतात की नाही हे मला माहीत नाही. अडाणी लोकांना ते प्राचीन काव्य वाचून दाखवतात. तू त्यांचा शिष्य कसा झालास? केव्हा झालास? तू त्यांच्यापासून काय मिळवलंस?" भास्करने वल्लभला प्रश्न विचारले.

तेव्हा वल्लभ स्वतःबद्दल सांगू लागला - "एका गरीब धनगराच्या कुटुंबात माझा जन्म झाला. लहानपणापासून मला कविता खूप आवडे. जे मनात येईल ते लिहून मी पशु पक्षांना ऐकवी. एकदा विद्याधर आमच्या गावी आले. रात्री मंदिरात जमलेल्या लोकांना त्यांनी व्यास रचित महाभारताचा काही भाग ऐकवला व त्यावर सुरस भाष्य केले. श्रोत्यांच्या शंकाचे समाधान केले. त्यांचे ज्ञान व वक्तृत्व पाहून मी मुग्ध होऊन गेलो. तेव्हा मी त्यांना विचारले - "गुरुजी, सौंदर्य आणि चांगुलपणा पाहिला की मला कविता स्फुरते. मग मी गीतांची रचना करतो. पण माझ्या गीतांचा अर्थ मलाच समजत नाही. आपण माझ्या काही कविता ऐका नि मला आपला अभिप्राय सांगा." असे म्हणून मी आपली काही गीत त्यांना ऐकवली.



माझी कविता ऐकून विद्याधर म्हणाले - "बेटा, तू सहज कवि आहेस. एक वर्ष सगात मी तुला महाकवि बनवीन."

मी त्यांच्या बरोबर गेलो, त्यांचेच अध्ययन केले. एक स्वरचित कविता मी गुरुजींना ऐकवली, तेव्हा त्यांनी माझी खूप प्रशंसा केली आणि म्हणाले - "जर नित्य अशी



काव्यरचना करण्याची तुझी इच्छा असेल तर राजाच्या आश्रयाला कधी जाऊ नकोस !''

मी गरीब होतो. काही काळ गुरुंची सेवा सुश्रुषा करून मी जेव्हा घरी परतलो, तेव्हा वडील आजारी असल्याचे पाहिले. घरातील सर्व जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. आता मला कविता करायला वेळच मिळणार नाही अशी मला भीति वाटली. मी राजधानीत गेलो. पण तेथील निराशाजनक परिस्थिति पाहून परत गावाकडे आलो. त्याच वेळी माझ्या गावातील एक श्रीमंत गृहस्थ रत्नाकर यांनी मला बोलविले. ते मला म्हणाले - ''माझा घरजावई बनून तू माझ्याच घरी राहिलास तर तुझ्या वडिलांची सर्व व्यवस्था मी करीन. तू कुठल्या ही व्यापात न पडता कविता करीत रहा.'

मी रत्नाकरजींचा प्रस्ताव मान्य केला आणि त्यांच्या मुलीशी मजला इच्छेशी लग्न केलं. मंजरी माझी पत्नी स्वभावानी बाई होती. [illegible] काम करून [illegible] घरी [illegible] काम हा तो मला मांग[illegible]

सहानुभूति दाखवीत भास्कर म्हणाला, ''अरेरे, तुझे जीवन तर मोठं कष्टप्रद आहे.''

''आता तर मी अगदी निश्चिंत आहे. कविता करायला मला भरपूर वेळ मिळतो. [illegible] मला काय पाहिजे?'' वल्लभ संतोषपूर्वक म्हणाला.

भास्करला वल्लभचं बोलणं रुचलं नाही. त्याला वाटलं याच्या कवितेत काव्यगुण नसतील, म्हणूनच राजाने याला आश्रय दिला नसावा. तो राजधानीकडे निघाला.

तेव्हा वल्लभ त्याला म्हणाला, 'राजधानीत वेदाचार्य नावाचे एक महान कवि आहेत. तू त्यांना भेटलास तर ते तुला मदत करतील.''

भास्कर राजधानीत [illegible] पोचला. तेथे वेदाचार्यांबाबत चौकशी करता समजलं की गावाबाहेर एका आश्रमात ते रोग्यांची सेवा करीत असतात. त्याला मोठं आश्चर्य वाटलं. त्याच्या दृष्टीने एका कवीला रोग्यांची सेवा करण्याची काय आवश्यकता? तरी पण त्याने आश्रम शोधून काढला नि तो वेदाचार्यांना भेटला.

भास्करकडून [illegible] सर्व माहिती [illegible] वेदाचार्य [illegible] म्हणाले, ''[illegible] मिळावा [illegible] [illegible] एक प्रकारचा [illegible] असतो. हे सत्य जाणूनच विद्याधर गुरु जंगलात [illegible] गेले. वल्लभ रत्नाकराचा जावई बनला. मी इथे रोग्यांची सेवा-सुश्रुषा करीत बसलोय. बरं, ते सगळं जाऊ दे. तुझं काव्य तरी बघू दे.''

भास्करने वेदाचार्यांना आपले काव्य दाखविले. थोडेसे काव्य वाचून वेदाचार्य म्हणाले, ''आता मला थोडा ही संशय राहिला नाही. आपल्या आश्रयाला आलेल्या कवींकडून राजा काय करून घेतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही तुझी कविता बघ. तू तर आता पासून ते काम सुरू केलं आहेस. तुला राजाश्रय अवश्य प्राप्त होईल.''

वेदाचार्यांच्या बोलण्याचा भास्करला खूप [illegible] त्याने विचारले, ''मी काय बरे चूक केली माझ्या काव्यात?''

वेदाचार्य निःसंकोचपणे म्हणाले - ''आपल्या काव्यात तू राजा चन्द्रभानूची भरमसाट स्तुति केली आहेस. ते या प्रशंसेला मुळीच योग्य नाहीत. आपली योग्यता नसताना राजे कवींकडून आपली प्रशंसा करून घेतात. आपल्या अयोग्यतेवर पांघरूण घाल[illegible]तात. ही त्यांची कार्यपद्धति मला मुळीच आवडत नाही. अशी खोटी स्तुति करणारा आणि करवणारा दोघे ही माझ्या दृष्टीने नीच आहेत.''

आता भास्करचे डोळे उघडले. तो दोन दिवस राजधानीत राहिला. तेथील ग्रंथालयात विद्याधर, वल्लभ आणि वेदाचार्य यांच्या सारख्या कवींच्या काव्याचे त्याने अध्ययन केले.

यानंतर राजाला न भेटताच तो आपल्या गावी परत आला. शांतपणे जीवन घालवीत त्याने नवनवीन काव्यांची रचना केली. राजाकडून आपला सन्मान व्हावा असा त्याने कधी प्रयत्न केला नाही.





शंकरचे वैराग्य

शंकरला गृहस्थ जीवन नकोसे झाले [illegible]. वृद्ध आई आणि बायको यांना सोडून तो देशाटन संचार करायला निघाला. हिंडत हिंडत तो शकलपूर नावाच्या एका गावी पोचला. [illegible] शंकरला भुरळ पाडली. गावाबाहेर विद्यानंदस्वामींचा आश्रम आहे असे त्याला समजले. स्वामीजींच्या दर्शनासाठी शंकर आश्रमात गेला.

त्याला पाहून विद्यानंदस्वामींनी मोठ्या प्रेमाने विचारले - ''बेटा, इकडे कसा आलास ? काय हवय तुला ?''

''आपला शिष्य म्हणून माझा स्वीकार कराल स्वामीजी? आपली सेवा करीत इथंच राहीन मी.'' शंकरने निवेदन केले.

स्वामीजींनी शंकरकडे आपादमस्तक पाहिले आणि म्हणाले - ''विद्यार्जन करण्यासाठी जे ब्रह्मचारी इथे येतात, त्यांना मी आपले शिष्य बनवतो. पण तू ब्रह्मचारी वाटत नाहीस. तू विद्यार्जनासाठी आला आहेस असे दिसत नाही.''

नम्रतापूर्वक शंकर म्हणाला - ''स्वामीजी, आपण तर सर्वज्ञ आहात. आपणापासून मी काही लपवू इच्छित नाही. मी ब्रह्मचारी नाही हे आपले अनुमान बरोबर आहे. मला बायको आहे, तीन मुले आहेत, घरात म्हातारी आई आहे. माझी बायको मोठी कजाग आणि भांडखोर आहे. माझ्या आईशी सतत भांडत असते. दोघी जणी कधी शांतपणे बसत नाहीत. सासू नि सून यांच्या भांडणात मला जीव नकोसा झाला. माझी परिस्थिति मोठी केविलवाणी झाली. दोघींच्या पैकी कुणालाच मी म्हणू शकत नाही 'चूक तुझी आहे !' कधी चुकून मी असं म्हणालो तर माझी धडगत नाही मग. घरात राहणं मला मुश्किल झाले. माझी मन:शांति नष्ट होऊन गेली म्हणून कुटुंबाच्या बंधनातून मुक्त होऊन शांति शोधण्यासाठी मी आपणाकडे आलो आहे. कृपा करून आपण मला आपला शिष्य बनवा, मानसिक शांति मिळवण्याचा उपाय मला सांगा.''

विद्यानंदांनी शंकरला स्पष्ट सांगितले की या आश्रमात गृहस्थांना स्थान नाही. तरी पण शंकर हट्ट धरून बसला. हातापाया पडला नि गयावया करू लागला. तेव्हा स्वामीजी म्हणाले - ''काही दिवस इथं रहायची परवानगी मी तुला देतो. मग गंभीरपणे विचार करून आपला निर्णय मी तुला सांगेन.''


एक आठवड्यातच शंकरला आश्रमीय जीवनाचा कंटाळा आला. आश्रमातील कठोर नियमांचे पालन करणे आपल्याला शक्य नाही असे त्याला वाटू लागले. आश्रमातील सात्त्विक आहार त्याला आवडेनासा झाला. त्याला वाटलं यापेक्षा भ्रमंति चांगली.

एक दिवशी रात्री शंकर अंगणात झोपला होता. स्वामीजींनी त्याला उठवलं. घाबरून शंकरने प्रश्न केला - ''काय झालं स्वामीजी, मला कशासाठी आपण उठवलं?''

''तसं काही विशेष नाही शंकर. मला जप करण्याची इच्छा झाली. खूप शोधली, पण जपमाला सापडत नाही. बघ. ऊठ, आणि ती शोधायला मला मदत कर पाहू.'' असे म्हणत स्वामीजी त्याला आश्रमाच्या बाहेर घेऊन गेले.

शंकरने विचारले - ''स्वामीजी, झोपण्यापूर्वी आपण जपमाला कुठे ठेवली हे आठवतंय का आपल्याला?''

की निंकारेकर



"खोलीच्या कोपऱ्यातील पाटावर ठेवली असावी असं वाटतंय. आत तर सर्वच अंधारी अंधार आहे पण बाहेर कसं पिठासारख चांदणं पसरलंय'" स्वामीजी म्हणाले.

शंकरला हसू आले. पण वरवर ते न दाखवता तो म्हणाला "स्वामीजी, जिथे वस्तू हरवली तिथेच ती शोधायला नको का? बाहेर शोधून ती कशी सापडेल?"

त्याच्या प्रश्नावर विद्यानंद स्वामी अमळ हसले आणि म्हणाले - "तू योग्यच म्हणालास. पण तू सुद्धा तेच करत आहेस. कुटुंबात जी सुख-शांति गमावलीस, ती देशभर भटकून शोधीत बसला आहेस. घर सोडून इतक्या दूर पर्यंत आलास! तुझ्याच प्रमाणे मला वाटलं खोलीत ठेवलेली वस्तु, शोधली तर बाहेर ही सापडेल कदाचित्!"

स्वामीजींच्या या बोलण्यामागील गूढार्थ आता शंकरच्या लक्षात आला. स्वामीजींच्या पायांवर डोके ठेवून तो म्हणाला "आपण माझे डोळे उघडलेत. मी आता आपल्या कुटुंबाबरोबर राहीन आणि जे आहे त्यात [illegible] करीन."

शंकरला आशीर्वाद देऊन विद्यानंद स्वामी [illegible] करतांना [illegible] इथे आश्रमात आली. सकाळी आपल्या बायकोला बरोबर घेऊन घरी जा."

स्वामीजींच्या या बोलण्याचे शंकरला [illegible] आश्चर्य वाटले. आपली बायको आश्रमात आलेली आहे हे त्याला माहीतच नव्हते. [illegible] [illegible] आपला नवरा विद्यानंदांच्या आश्रमात आहे हे बायकोला समजलं, ती रात्री आश्रमात आली. ती स्वामीजींच्या पाया पडली आणि तिने [illegible] घेतली की इथून पुढे ती कधी ही सासूशी भांडणार नाही. ती स्वामीजींना म्हणाली "आता मी सासूशी प्रेमाने वागेन. शंकरला दुःख होणार नाही असा प्रयत्न करीन. आपण शंकरला उपदेश करा नि त्याला माझ्या बरोबर घरी पाठवा."

सकाळी उजाडताच नवरा बायकोने स्वामीजींची अनुमति घेतली आणि आपल्या गावाकडे जायला निघाले.





महाभारत

फिरत फिरत एकचक्रनगरीत आलेला ब्राह्मण आपली भ्रमण गाथा सांगत होता, व आपल्या आश्रयदात्या ब्राह्मणकुटुंबासह पांडव ते वर्णन लक्षपूर्वक ऐकत होते. पांचाल देशाचा राजा द्रुपद यांच्याबद्दल बोलता बोलता ब्राह्मण सांगत होता.

'संतानप्राप्तीच्या इच्छेने द्रुपदाने कित्येक आश्रमात जाऊन अनेक ऋषिमुनींची सेवा केली. आपल्याला एक पुत्र व एक कन्या असावी अशी त्याची तीव्र इच्छा होती. पुत्राच्या हस्ते द्रोण वध करायचा त्याची आकांक्षा होती आणि कन्या अर्जुनाची पत्नी व्हावी, अशी आशा धरून तो सर्वत्र संचार करत राहिला; निरनिराळ्या ऋषि-मुनींना भेटत राहिला. फिरता फिरता गंगाकिनारीच्या एका आश्रमात तो पोचला. तेथे याज व उपयाज या नावांचे दोन भाऊ वेदपारायण व सूर्योपासना करत असत. ते काश्यप गोत्रीय होते. द्रुपदाला वाटले की त्यातला उपयाज हा अधिक तपोबलसंपन्न आहे, त्यामुळे तो त्याच्याजवळ राहून खूप श्रद्धा व भक्तीने त्याची सेवा करू लागला.

एके दिवशी एकान्तात उपयाजचे पाय दाबत असताना द्रुपद त्याला म्हणाला, "मुनिवर, द्रोणाने माझा घोर अपमान केलाय. आपण प्रिय शिष्य अर्जुन याच्याकरवी युद्धात माझा पराभव करवून त्याने मला बांधून स्वतःसमोर आणवले. नंतर त्याने स्वतःच्या पसंतीने माझ्या राज्याचे दोन भाग करून, मोठा उदारपणा दाखवत त्यातला एक भाग मला परत दिला. तेव्हापासून मी अपमानाने आतल्या आत जळतोय, पण

द्रुपदाची अपत्ये



माझ्यात किंवा अन्य कोणत्याही राजात त्याचा वध करण्याची शक्ती नाहीय. तेव्हा एखाद्या यज्ञाद्वारे असा एक पुत्र अुत्पन्न करून द्या, की जो या द्रोणाला मारण्या इतका बलसंपन्न असेल. त्यासाठी मी तुम्हाला असंख्य पशुधन अन् अगणित अुपहार देईन. तुम्ही मागाल ते द्यायची माझी तयारी आहे. माझ्यावर इतकी कृपा कराच. माझा जन्म सार्थक होईल. आपलं ध्येय पूर्ण करून मी कृतकृत्य होईन."

आपले मस्तक नकारात्मक हलवत अुपयाज म्हणाला, "या कामात मी तुला मदत करू शकणार नाही. असल्या कामात मी कोणालाच सहाय्य देणार नाही." या विषयावर द्रुपदाने अधिक काहीच बोलू नये, असे सुचवण्याइतके ठामपणे अुपयाज हे बोलला होता.

द्रुपद या बोलण्याने जराही निराश झाला नाही. अुलट तो सतत श्रद्धापूर्वक अुपयाजच्या सेवेला लागला. एके दिवशी तो द्रुपदाला म्हणाला, "राजा, तू मोठ्या श्रद्धेने माझी सेवा करतो आहेस. पण तुझी इच्छा मुळातच अनुचित आहे. ती मी कोणत्याही स्थितीत पूर्ण करणार नाही. तरीही मी तुला एक अुपाय सांगतो. तू माझा ज्येष्ठ बंधु याज याच्या आश्रमाला जा. आपल्या सेवेने तू त्याला संतुष्ट कर, त्याला यज्ञासाठी तयार करण्याला लागून राहा; तुझी इच्छा पूर्ण होण्याची शक्यता आहे. तो पहिल्या पासूनच लोभी आहे. एकदा त्यानं घाणीत पडलेलं फळ अुचलून खाल्लं. आम्ही दोघं गुरुकुलात विद्याभ्यास करत असतानाही तो शुद्धता अन् स्वच्छता पाळत नसे. जिभेला रुचकर लागेल ते खात असे, मग ते कुठं का मिळालेलं असो. यावरून स्पष्टच दिसतं, की तो ऐहिक सुखांना प्राधान्य देतो."

अुपयाजने सुचवल्याप्रमाणे द्रुपद याजच्या आश्रमात गेला. त्याला सविनय प्रणाम करून ऐंशी हजार गायी अर्पण केल्या आणि नन्तर आपली इच्छा प्रकट केली.

याजने द्रुपदाची इच्छा पूर्ण करण्याचं कबूल केलं. अुपयाजला त्याने आपला सहायक बनवला अन् आवश्यक सामग्री गोळा करून पुत्रकामेष्टी यज्ञ सुरू केला. होमानन्तर आहुति आपल्या हाती घेअून याजने द्रुपदपत्नी कोकिलादेवी हिला बोलावून घेतलं. तो तिला म्हणाला, "राणी, ही आहुती घे. यामुळे तुझ्या पोटी एक पुत्र व एक कन्या जन्म घेईल."

कोकिलादेवी म्हणाली, "मुनिवर, मी आत्ता शुद्ध नाहीय. थोडा वेळ थांबा. मी स्नान करून येअून आहुती स्वीकारते."

"कष्टानं दीक्षा घेअून मी ही आहुती प्राप्त केली, तिच्या योगाने तुझी इच्छा पूर्ण होणार नाही, अशी शंका तुझ्या मनात आलीच कशी? तुला हवी तर घे, नाहीतर दे सोडून." असं रागानं म्हणून त्याने ती आहुती अग्नीत फेकून दिली.

तत्क्षणी त्या अग्निकुंडातून एक रथारूढ तरुण वीर बाहेर आला. त्याच्या एका हातात चमकती तलवार व दुसऱ्यात धनुष्य असून डोक्यावर हिरेजडित मुकुटही होता. सिंहनाद करत तो तेथून निघून गेला. त्या अग्निकुंडातून यानन्तर एक पुत्र व एक कन्या असा अपत्यलाभ झाला. सारी पांचाल जनता यामुळे आनन्दित झाली.

इतक्यात कोकिलादेवी सुस्नात होअून तेथे येअून पोचली. "अग्निकुंडातून अुत्पन्न झालेल्या या दोन्ही अपत्यांची आपण माता बनावे," असा वर तिने याज व अुपयाज यांच्याकडून मिळवला.

ब्राह्मणांनी द्रुपदपुत्राचं नाव धृष्टद्युम्न असं ठेवलं. कन्या रंगानं सावळी असल्यानं तिचं नाव ठेवलं कृष्णा. द्रुपदाने नन्तर याजला असंख्य गायी व ब्राह्मणांना विपुल धन दान दिलं. आपली ध्येयसिद्धी करून तो कांपिल्य नगराला परत आला.

काही दिवसांनी द्रुपदाने धृष्टद्युम्नाला





द्रोणाकडे धनुर्विद्या शिकण्यासाठी पाठवले. आपली कोणत्याही प्रकारे बदनामी होऊ नये म्हणून द्रोणानेही त्याचा शिष्य म्हणून स्वीकार केला. गुरुद्रोणानी या तरुणाला संपूर्ण धनुर्विद्या शिकवली.

द्रुपदाची कन्याही आता विवाहयोग्य झाली होती. प्रथम पासूनच द्रौपदीचा विवाह अर्जुनाशी व्हावा अशी द्रुपदाची इच्छा होती. परन्तु पांडव लाक्षागृहात जळून गेल्याची बातमी कळल्यावर तो फार निराश झाला. आता काय करावे याबद्दल त्याने आपल्या मन्त्र्याचा सल्ला मागितला.

तेव्हा द्रुपदाचा शुभचिंतक एक पुरोहित म्हणाला, "महाराज, मला तर असं वाटतंय की पांडव मेले नाहीत. अनेक शुभशकुनांवरून असं वाटतं की ते जिवन्तच आहेत, अज्ञात आहेत. त्यांच्या बाबत आपण निश्चिन्त असावं. आपण आपल्या कन्येच्या स्वयंवराची घोषणा करावी. माझी खात्री आहे की त्यावेळी पांडव नक्की इथे येतील. तसं तर एखाद्या राजकन्येचं स्वयंवर मांडणं, हे परंपरेला धरूनच आहे."

स्वयंवरासाठी तीन महिन्यांनंतरचा मुहूर्त निश्चित केला गेला. त्यासाठी एक असे धनुष्य मुद्दाम बनवण्यात आले, की ज्याला प्रत्यंचा लावणेच कुणालाही अशक्य असावे. मोकळ्यावर एका जागी चक्राकार फिरणारे सुवर्णाचे मत्स्ययन्त्र लटकावण्यात आले.

एकचक्रापुरातल्या ब्राह्मणाला व पांडवांना वरीलप्रमाणे सर्व विवरण देत अतिथि ब्राह्मण म्हणाला, "अनेक राज्यांचे राजे व राजकुमार या स्वयंवरासाठी कांपिल्य नगरीकडे रवाना झाले आहेत."

आपले गुरु द्रोणाचार्य यांचा वध करणारा कोणी युवक जन्माला आलेला आहे, हे कळल्यावर पांडवांना फार वाईट वाटले. पण 'जे व्हायचे असेल ते होईल' असा विचार करून ते शान्त राहिले. त्यांना ही द्रौपदी स्वयंवराला जावेसे वाटू लागले.

त्यांची इच्छा कुन्तीने ओळखली व ती धर्मराजाला म्हणाली, "पुत्रा, आपण फार दिवस या एकचक्रापुरात रहात आहोत. इथेच आणखी काही दिवस राहिलो, तर कदाचित् आपल्याला इथे भिक्षा मिळणं बन्द होईल. मला वाटतं, की आता आपण पांचाल राज्यात जावं. तो मोठा सुसंपन्न देश असून, असे म्हणतात की राजधानी कांपिल्य ही मोठी सुन्दर नगरी आहे. राजा द्रुपदाचा [illegible] मोठा [illegible] असतो, असंही ऐकिवात आहे."

धर्मराजाने आपल्या बंधूंशी सल्लामसलत केली अन् मातेच्या प्रस्तावाला मान्यता देत त्यांनी आपला [illegible] प्रकट केला. [illegible] ब्राह्मणाचा निरोप घेऊन ते तेथून बाहेर पडले.

रात्रंदिवस प्रवास करत एके दिवशी मध्यरात्री ते गंगातटाकी पोचले. तेथे असलेल्या सोमश्रव नावाच्या तीर्थस्थानावर ते गेले. अंधार दाटलेला होता. अर्जुन हाती पेटती मशाल घेऊन पुढे चालू लागला. नदीच्या पात्रात स्नान करून आपला थकवा घालवायचा त्यांचा मानस होता. ते पात्राकडे चालू लागले. त्याच वेळी अंगारपर्ण नामक एक गंधर्व आपल्या पत्नी-परिवारासह जलक्रीडेसाठी तेथे आलेला होता. माणसांची चाहूल [illegible] ओरडला, "कोण आहात तुम्ही ? इथून दूर निघून जा कसे ! इथलं आसपासचं सारं वन माझ्या मालकीचं आहे. मी अंगारपर्ण नावाचा गंधर्व [illegible] ही यक्ष आणि गंधर्वांची संचारवेळा आहे. मानवाच्या संचाराला यावेळी निषिद्ध आहे."

त्याच्या बोलण्याने नाराज होऊन अर्जुन म्हणाला, "अरे दुष्टा, हिमालय आणि गंगा नदी ही काही कोणाची पैतृक संपत्ति नव्हे ! या दोन्ही वस्तु सर्वांच्याच आहेत. मध्यरात्र असो वा भोजनोपरांत समय असो, गंगा नदी दिसली की त्यात लगेच स्नान करणं अत्यावश्यक असतं



न [illegible] पृथ्वीवर आहे, [illegible] मला [illegible] न करता परत फिरण्याचा प्रश्नच नाही.

[illegible] कारण सांगताना आणि [illegible] वध [illegible] करू लागला. [illegible] आग [illegible] मशालीने [illegible] अर्जुन म्हणाला, "अरे गंधर्वा, आपल्या [illegible] कृत्यांनी आम्हाला धमकावायला [illegible] आम्हाला समजतात [illegible] [illegible] नाही [illegible]."

अर्जुन असे बोलत असतानाच त्याने आग्नेयास्त्राचा प्रयोग केला. त्याबरोबर गंधर्वाचा रथ पेटून जळून भस्मसात झाला. गंधर्व खाली पडून मूर्च्छित झाला.

अशा परिस्थितीत गंधर्व पत्नी कुंभीनसी धर्मराजाकडे जाऊन पतिप्राणांची भिक्षा मागू लागली.

धर्मराज अर्जुनाला म्हणाला, "ही आपल्याला शरण आलेली आहे. तिच्या पतीला मारणं हा अधर्म होईल. तू गंधर्वाला सोडून देणंच योग्य!"

ज्येष्ठ बंधूचे बोलणे मानून अर्जुनाने गंधर्वाला सोडून दिले. तेव्हा गंधर्व अर्जुनाला म्हणाला, "मी तुझ्या हातून पराजित झालो आहे. इथून पुढे माझे नाव अंगारपर्ण राहणार नाही. तू जाळलेल्या रथाच्या जागी एक नवा रथ निर्माण करून मी चित्ररथ असे नाव धारण करीन. तू महान वीर आहेस. मी तुला प्रसाद म्हणून चाक्षुषी नावाची विद्या देतो. तिच्या साहाय्याने तिन्ही लोकात चाललेल्या घटना तू पाहू शकशील. आमच्या जवळ ही विद्या असल्यामुळे प्रत्यक्ष देव ही आमचं काहीही नुकसान करू शकत नाहीत. चाक्षुषी विद्येबरोबरच मी तुला काही दिव्य अश्व प्रदान करीन अन् तुझ्या बंधूंनाही प्रत्येकी शंभर शंभर अश्व देईन."

अर्जुन त्याला म्हणाला, "मी तर अगदी जवळच्या मित्राकडूनही कधी कशाचा स्वीकार करत नाही."

यावर गंधर्व म्हणाला, "ठीक आहे; तर तू आपली एखादी वस्तु मला देऊन बदल्यात याचा स्वीकार कर."

गंधर्वाला आग्नेयास्त्र देऊन अर्जुनाने त्याच्या भेटींचा स्वीकार केला.

गंधर्व अर्जुनाला म्हणाला, "तू क्षत्रिय आहेस. तेव्हा एखाद्या योग्य अशा पुरोहिताची निवड कर. त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागल्यानंतर तुझे कल्याण होईल. तसं न केलंस, तर तुझं शुभ होणार नाही."

आग्नेयास्त्राचा प्रयोग समंत्र समजावून देऊन अर्जुन गंधर्वाला म्हणाला, "आपले हे अश्व तात्पुरते स्वतः जवळच ठेव. आवश्यकता पडेल, तेव्हा ते मी मागवून घेईन." आणि त्याचा निरोप घेऊन कुन्तीसह पांडव पुन्हा आपल्या प्रवासाला निघाले.

गंगातटावरून निघून पांडव उत्कोच तीर्थावर पोचले. धौम्य ऋषी इथेच तपस्या करत होते. पांडवांनी त्यांना सविनय प्रणाम केला. त्यांनी मुनींना आपले पुरोहित बनण्याबद्दल प्रार्थना केली. पांडवांची वीरता, साहस, उत्साह व प्रज्ञा हे गुण आपल्या दिव्य दृष्टीने जाणून ते आपल्या पौरोहित्याला योग्य असल्याचे त्यांनी ओळखले. अतिथि सत्कार करून धौम्य ऋषींनी पांडवांचे पुरोहित बनायला आपली सहर्ष स्वीकृती दिली. त्यांची स्वीकृती मिळताच पांडवांना असं वाटलं की, आपण आता संपूर्ण भूमंडलाचे राजेच बनलो आहोत. त्यांना अत्यानन्द झाला.

त्याच वेळी द्रौपदी स्वयंवरासाठी निघालेले काही लोक धौम्य ऋषींच्या आश्रमात आले. ते बघताच पांडवांनीही आपली माता व पुरोहित धौम्य त्यांच्याबरोबर जाण्याची इच्छा प्रकट केली. ब्राह्मणवेषातल्या पांडवांना पाहून एका ब्राह्मणाने त्यांना ते कोण व कोठून आले असल्याबद्दल विचारले.

"आम्ही एकचक्रापुरीहून कांपिल्य नगराकडे जात आहोत." धर्मराज उत्तरला.

"आम्हीही तिकडेच निघालो आहोत. तिथे द्रुपदपुत्री द्रौपदीचं स्वयंवर होणार आहे. ती अद्भुत सुंदर आहे असं ऐकलंय. बरेच राजे आपलं भाग्य आजमावायला उत्सुक आहेत. जे ब्राह्मण तिथे हजेरी लावतील त्यांना राजा गोदान, सुवर्णदान देणार आहे. आम्हीही जात आहोत तिकडे." ब्राह्मण म्हणाले.

सर्व मिळून दक्षिण पांचाल मध्ये असलेल्या कांपिल्यनगरीकडे निघाले.



'चान्दोबा' पुरवणी - ८०


आपल्या देशाची वृक्षसंपदा

क्षीर चाफा

आपण इकडे तिकडे जात असताना काही विशेष लक्ष न देता ही आपल्या रंगीबेरंगी फुलांनी काही झाडे आपले लक्ष वेधून घेतात. अशातीलच एक झाड म्हणजे क्षीर चाफा. ही झाडे अधिकतर मंदिरांतून वाढतात; म्हणून यांना मंदिरवृक्ष ही म्हणतात. हिन्दू ही फुले पूजेसाठी वापरतात. ही झाडे सर्वत्र वाढतात, वाढवतात, म्हणून बौद्ध लोक याला अमर मानतात. ते अविनाशाचे चिन्ह समजतात. ही झाडे स्मशानातही लावली जातात.

ही झाडे फारशी उंच वाढत नाहीत. यांच्या फांद्या जमिनीकडे झुकलेल्या असून मुख्य खोडही वाकडेच असते. झाडाचे पान किंवा फांदीला छोटीशी चीर पाडली तर लगेच त्यातून दाट, दुधासारखा चीक बाहेर येतो. या झाडाला वृक्षशास्त्रात वनस्पतीशास्त्रात 'फ्रांगी पानी' म्हणतात. याचे असं नाव का पडले याबद्दल निरनिराळ्या गोष्टी सांगितल्या जातात. या झाडातून दूध निघत रहात असल्यामुळे फ्रेंच लोकांनी झाडाला हे नाव दिले असे म्हणतात. असे ही म्हणतात की इटलीतील एका माणसाने या फुलांच्या सुवासापासून सुगंधी तेल बनवले, म्हणून त्याच माणसाचे नाव या झाडाला देण्यात आले. हिन्दीत याला 'चम्पा' किंवा 'गुलचिन', असामीमध्ये 'गोलची', तमिळमध्ये 'कळ्ळिमंदारै', कानडीत 'काडुसंपग', उडिया भाषेत 'गोलुची', बंगालीत 'गोलक चंपा', तेलगूत 'वालसंपेंग' व संस्कृतमध्ये याला 'क्षीर चम्प' असे म्हणतात.

याची पानं रुंद असून दोन्ही टोकांना निमुळती व टोकदार असतात. झाडांना फुले येतात तेव्हा ती फार शोभिवन्त दिसतात.



या झाडाची पाने, फुले व फांद्यासमधून निघणाऱ्या चिकाचा निरनिराळ्या औषधांसाठी व तेलांसाठी वापर केला जातो. याच्या सालांमुळे काही त्वचारोग बरे होतात.

शोभेसाठीही ही झाडे लावली जातात.

उद्दालक



वेदमंत्र आपल्या शिष्यांना सुयोग्य स्पष्टीकरणासह शिकवणाऱ्या ऋषिपुंगवांमधे प्रमुख होते उद्दालक मुनी. अरुणाचे पुत्र असल्यामुळे त्यांना अरुणी असेही म्हणत.

अरुणीला बाल्यावस्थेतच विद्येची गोडी होती, गुरुजनांबद्दल मनात श्रद्धा-भक्ती होती. विद्याभ्यासासाठी ते धौम्य ऋषींच्या आश्रमात राहून राहिले, त्यांचे शिष्य बनले. आश्रमाजवळ एक तलाव असून एक शेत ही होते. धौम्यांजवळ राहून ते उत्तम शिष्यांपैकी एक गणले गेले. गुरूंची सेवा त्यांनी खूप श्रद्धेने केली. सदासर्वदा ते वेदवेदांगे संपूर्ण रुपात शिकावी, जाणावी या प्रयत्नात असत.

एक दिवशी रात्री जोराचा पाऊस पडत होता, तलावाजवळच आश्रमाचे शेत असून त्यात हिरवेगार पीक डोलत होते. पावसाने गंभीर रूप धारण केले. तर तलावाचा बांध फुटून शेतातल्या उभ्या पिकाची नासाडी होईल या भयाने धौम्य गुरुजी काळजीत होते. अरुणी त्यांना म्हणाला, "गुरुजी, मला आज् द्या ना तिथे ! मी तिथे जाऊन जरूर ती सोय करीन अन् शेत वाचवीन."

पाऊस जरा कमी होत होता, म्हणून गुरुजींनी अरुणीला शेताकडे जायला परवानगी दिली.

अरुणी शेतात पोचला. तलावाच्या बांधाला भेग पडलेली त्याला दिसली, त्यातून थोडे थोडे पाणी शेतात झिरपत होते. भेग लक्षपूर्वक पाहून त्याने ती चिखलाने लिपून बंद करायचा प्रयत्न केला. परंतु सतत बाहेर येत रहाणाऱ्या पाण्यामुळे तेथे माती टिकेना. हळूहळू त्यातून जास्तजास्त पाणी बाहेर येऊ लागले. अरुणीच्या लक्षात आले की परिस्थिती जास्तच गंभीर व कठीण होऊ लागली आहे. तो स्वतः ताबडतोब त्या भेगेवरील भागावर आडवा पडला. त्याच्या शरीराच्या दाबामुळे बांधातून पाणी येणे बंद झाले. परंतु नंतर हवेतील गारवा वाढला आणि पाऊसही अधिक जोराने पडू लागला. तरीही अरुणी जागच्या जागी, अजिबात हालचाल न करता पडून राहिला. थोड्याच वेळात तो बेशुद्ध झाला.

इकडे अरुणीला परतायला उशीर झाल्याने धौम्य ऋषी काळजीत पडले. मोठ्या आतुरतेने ते आपल्या इतर शिष्यांना बरोबर घेऊन शेताकडे निघाले.

पहाट होता होता ते बांधाजवळ पोचले. भेगेच्या वरील भागावर बेशुद्धावस्थेत असलेला अरुणी त्यांना दिसला. अन् ते आश्चर्यचकित झाले. बाकी शिष्य ती भेग बुजवायच्या कामाला लागले अन् धौम्य अरुणीला आपल्या हातात उचलून आश्रमात घेऊन आले. त्याला त्यांनी अग्नीच्या जवळ ठेवले. थोड्या वेळाने त्या उष्णतेमुळे अरुणी शुद्धीवर आला.

मोठ्या प्रेमाने गुरुजी त्याला म्हणाले, "अरुणी, आज तुझा विद्याभ्यास पूर्ण झाल्याचं तू सिद्ध केलं आहेस."

अरुणी वेदवेदांगांचा प्रकांड पंडित असूनही वेळ पडल्यास शारीरिक श्रम करायलाही कचरत नसत. इतरांच्या कल्याणासाठी त्यांनी देहत्यागाचीही तयारी दाखवली. पण त्यांना याबद्दल जराही गर्व न वाटता, उलट ती आपली जबाबदारीच वाटली. आपल्या शिष्याच्या कर्तव्य परायणतेबद्दल गुरुजींना धन्यता वाटली.

पुढे अरुणी उद्दालक नावाने प्रसिद्ध झाले व ते सर्वश्रेष्ठ गुरु बनले. शिष्यांच्या प्रेमादराचा विषय बनले. त्यांचा कीर्तिध्वज फडकत राहिला.



तुम्हाला माहीत आहे काय?

१. खजुराहो मंदिर आपल्या देशाच्या कोणत्या भागात आहे?
२. पाणबुडीचा शोध प्रथम कोणी लावला?
३. मलई व दूध यात जास्त वजनदार काय?
४. शिखांच्या पवित्र ग्रन्थाचे नाव काय?
५. नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या व्यक्तींमधे सर्वात कमी वयाचे कोण?
६. 'सॉल्ट लेक' नावाने ओळखला जाणारा स्टेडियम कोठे आहे?
७. पिसाळलेला कुत्रा चावल्यावर इलाजासाठी लागणारी लस कोणी शोधली?
८. मार्जार कुटुंबातील पशूंना आपली नखे लपवण्याची सोय अुपलब्ध असते. पण त्यांतील केवळ एकाच प्राण्याला ती अुपलब्ध नाही. तो प्राणी कोण?
९. कॅलेण्डर पद्धत प्रथम कोणत्या देशात सुरू झाली?
१०. आपल्या देशातील कोणत्या प्रान्तात दर वर्षी 'नावांच्या स्पर्धा' होतात?
११. एका नगराची निर्मिती १४ बेटांवर झालेली आहे. ते नगर कोणते?
१२. पहिल्या पेशव्याचे नाव काय?
१३. रोम नगर कोणत्या नदीतीरावर वसले आहे?
१४. पहिल्या अंतरिक्षयानाचे नाव काय? त्याचा प्रयोग केव्हा केला गेला?
१५. दहा वर्षांपूर्वी बुद्धिबळातील विश्वविजेता कोण होता?
१६. शहामृग किती वेगाने धावू शकते?
१७. 'थायलंड' चे प्राचीन नाव काय?
१८. पाण्यात 'ब्लॅकबर्ड' चा रंग फिरता असतो तो कोणता?
१९. हवेसाठी पृष्ठभागावर न येता देवमासा पाण्याच्या आत किती वेळ राहू शकतो?
२०. 'चीन' ची करन्सी कोणती?

अुत्तरे

१. मध्यप्रदेश.
२. फर्डिनन्ड व्हान वेजेल.
३. दूध.
४. आदिग्रंथ, ग्रंथ साहेब.
५. विल्यम लॉरेन्स ब्रॅग.
६. कलकत्ता.
७. लुई पाश्चर.
८. चित्ता.
९. इजिप्त.
१०. केरळ, ओणमी जवळ.
११. स्टॉकहोम.
१२. बाळाजी विश्वनाथ भट (१७१३ ते १७२०).
१३. टायबर नदी.
१४. स्पुटनिक, १९५७ मधे.
१५. ॲनातोली कार्पोव्ह.
१६. ताशी ६० कि.मी.
१७. सयाम.
१८. गच्चकाळा रंग.
१९. वीस मिनिटे.
२०. भुबान.



सभ्य माणसांचा विनोद

गर्भश्रीमन्त प्रफुल्ल वक्रबुद्धीचा अन् विचित्र मनाचा होता. सुखी-समाधानी माणसांना विनाकारण त्रास देअून त्यांना दु:खी करण्यात त्याला आनन्द वाटे. त्याच्या या वाईट सवयीमुळे त्याची बायको अुर्मिला नेहमीच दु:खी-कष्टी असे.

अुर्मिलाचा भाअू भूषण याला ही हकीकत समजली आणि त्याने आपल्या मेहुण्याला वठणीवर आणायचे ठरवले. नंतर एक दिवस तो प्रफुल्लच्या घरी आला. प्रफुल्लने त्याचे स्वागत केले आणि नंतर आपण कोणाकोणाला अन् कसकसे सतावले याबद्दलच्या गोष्टी सांगितल्या. त्या सांगताना तो स्वत: जोरजोरात हसतही होता.

भूषण त्याला म्हणाला, "तुम्ही जे काही मला सांगत होता, ते ऐकून मला हसू तर मुळीच आलं नाही; अुलट दु:खच वाटलं! तुम्हाला इतकं कशाचं हसू येत कळत नाहीय मला!"

"विनोद करणे ही एक कला आहे. प्रत्येकालाच नाही जमत ते! तू अुद्या आमच्या बैठकीत ये, अन् बघ. मी तुला आता सांगितलेल्या सगळ्या गोष्टी ऐकून ते कसे पोट धरधरून हसतील ते पहाच." प्रफुल्ल म्हणाला.

दुसऱ्या दिवशी खरोखरच बैठकीतले लोक प्रफुल्लच्या बोलण्यावर हसत राहिले.

घरी आल्यावर भूषणने अुर्मिलेला कारण विचारले. ती म्हणाली, "हसतील नाहीतर काय करतील? न हसतील त्यांना चाबकाचा मार खावा लागेल."

"ऑं? तुझा नवरा काय कोणी राजा लागून गेलाय की काय? चाबकानं मारलं तर सभासद गप्प रहातील होय?" आश्चर्य प्रकट करत भूषणने विचारले.

"गरीब आहेत ते बिचारे! पिण्या खाण्यासाठी, काहीही मदत करण्यासाठी तुझे

शीला भागवत



मेहुणे त्यांना पैसे देतात. म्हणूनच ते जे काही सांगतील ते त्यांना ऐकावंच लागतं. त्यांना हे मान्य असेल, त्यांनाच फक्त बैठकीत प्रवेश मिळतो. पैसा बोलतोय बरं!"

प्रफुल्लला एकान्तात गाठून भूषण म्हणाला, "विनोद काय असतो, हेच बहुधा तुम्हाला माहीत नसावं. तुमच्यासारख्या माणसा बरोबर रहावं लागल्यामुळेच तुमची बायको आणि नोकर बहुधा दु:खी दिसतात."

"सोड त्यांचा विषय! त्यांचे चेहरेच तसे रडके आहेत! तू तर स्वत:च बैठकीत येऊन माझा विनोद सभासदांना कसा हसवतो, हे पाहिलं आहेस." भूषण बोलला.

"विनोदाचा असा अर्थ नव्हे, की पैसे देऊन इतरांना हसवावं! विनोद तर असा असावा की जो ऐकून लोकांना आपली दु:खंही विसरून हसायला लागावं." भूषण बोलला.

हे ऐकून प्रफुल्लचा चेहराच पडला! तो म्हणाला, "अच्छा, तुला कळलीं होय खरी बात? पण काय रे, तू धन देऊन तरी हसवू शकशील लोकांना?" प्रफुल्लचे हे आव्हानच होते.

"अंहं! पण आमच्या गावात चतुर नावाचा एक तरुण आहे. तो बोलू लागतो, तेव्हा कोणाच्याही डोळ्यातून आनन्दाश्रू सरू लागतात." भूषण म्हणाला.

"मग बोलाव तर त्याला लवकर." प्रफुल्ल म्हणाला.

भूषणचा निरोप मिळाल्यावर दुसऱ्याच दिवशी चतुर तेथे हजर झाला. प्रफुल्ल त्याला म्हणाला, "माझ्या मेव्हण्याचं म्हणणं आहे, की लोकांना हसवण्यात तुझा हात धरणारा कोणी नाहीय. तुझी परीक्षा घेण्यासाठीच मी तुला इथं बोलवलंय. हां, पण परीक्षा मात्र थोडीफार कठोर आहे. सहन करू शकशील?"

चतुर एकदम हसला, अन् हसतच राहिला.

"का? हसत का राहिलास?" प्रफुल्लने चिडून विचारले.

"भूषणनं सांगितलं होतं की आपल्या प्रत्येक बोलण्यात हसू फुटतं. मला वाटलं की हाही विनोद असेल, म्हणून हसलो मी." चतुरने सांगितले.

"'असेल' म्हणून हसतोस होय? विनोद ही काय तुझ्या आकलनाबाहेरची गोष्ट आहे?" प्रफुल्लने विचारले.

"आकलनाबाहेर थोडाच आहे? पण जो परीक्षा घेणार असतो, त्याच्याकडून चांगलं नावही मिळवायला हवं ना? म्हणून हसलो मी." चतुर उत्तरला.


चिडून प्रफुल्ल म्हणाला, "निरर्थक गोष्टींवर हसलास तर चाबूक बसेल पाठीवर."

भूषण म्हणाला, "मेहुणेमहाराज, तुमची बैठक बोलवा अन् जाहीर करा की भूषणच्या बोलण्याने जे जे हसणार नाहीत, त्यांना रोख रकम दिली जाईल. अन् हे ही सांगा की, जे हसतील त्यांच्या पाठीवर चाबूक ओढला जाईल."

प्रफुल्लने हे मान्य केले. मग चतुर म्हणाला, "पण महाराज, हसवण्यासाठी मी तिथे काहीही बडबडेन. मी काहीही बोललो, तरी तुम्ही आपलं तोंड उघडायचं नाही."

प्रफुल्लने अट कबूल केली. दुसऱ्या दिवशी सभा भरवण्यात आली. अट माहीत झाल्यामुळे लोक नेहमीपेक्षा खूप अधिक संख्येने उपस्थित झाले होते.

सभासदांसमोर उभा राहून चतुर त्यांना म्हणाला, "बंधूंनो! देवानं मला इतरांना हसवायची शक्ती दिलेली आहे. आनंदामुळे हसू येतं म्हणे. पण असंही म्हटलं जातं की हसण्यामुळे कधी संकटं कोसळतात, नुकसान होतं. मी तुम्हाला हसवल्यामुळे तुम्हा सर्वांचा दोन तऱ्हेचा तोटा होणार आहे. एक म्हणजे,





व्यर्थ गेलेले वर

जंगला जवळील एका गावात एक लाकूडतोड्या झोपडीत आपल्या बायको बरोबर रहात असे. तो गरीब होता, खूप कष्ट करून आपलं पोट भरायचा. तरी पण सुखा-समाधानाने तो जीवन जगत असे.

काही धीमंत लोकांनी त्याच्या झोपडीजवळ आपली घरं बांधली, त्यांचे ऐष-आरामी जीवन पाहून लाकूडतोड्या आणि त्याच्या बायकोला त्यांचा हेवा वाटू लागला.

एक दिवशी घरात बसून नवरा-बायको यासंबंधीच बोलत बसले होते. बायको म्हणाली- "आपलं नशीबच फुटकं ! जर आपल्या जवळ पुष्कळ पैसा असता, तर आपण ही असेच आरामात राहिलो असतो."

नवरा म्हणाला - "मी म्हणेन की हे लोक काही सुखी नाहीत. जर माझ्या पाशी धन असतं, तर मी यांच्यापेक्षा सुखाने राहिलो असतो."

"एखाद्या देवाने आपल्याला ही काही वर दिला तर काय छान होईल नाही !" बायको म्हणाली.

तिचं बोलणं संपतच होतं एवढ्यात झोपडीत अकस्मात् एक स्त्री प्रकट झाली. तिच्याकडे पाहताच दोघांना वाटले की ही कोणी सामान्य स्त्री नाही, तर एक देवी आहे.

"मी एक देवता आहे. मला माहीत आहे की तुम्ही एखादा वर प्राप्त करण्यासाठी फार आतुर आहात. मी तुम्हाला तीन वर देते. याहून अधिक कशाची माझ्याकडून अपेक्षा करू नका. जे मिळाले त्यात संतुष्ट रहा." असे म्हणून देवी अंतर्धान पावली.

या अकस्मात् घटनेचे दोघांना ही फार आश्चर्य वाटले. काय वर मागावा हे दोघांना ही समजेना.

बायको उत्साहाने म्हणाली - "आपण असा एक वर मागू या की आपण ही श्रीमंत लोकांसारखे आयुष्य घालवू शकू."

"जवळ पैसा असला म्हणजे काय होईल माहीत आहे? चोर आपल्या घरात शिरतील आणि आपली सर्व संपत्ति लुटून नेतील. मला वाटतं आपल्याला दीर्घायुष्य मिळावं असा वर आपण मागू या."

"दीर्घायुष्य मिळालं तर त्यापासून काय फायदा? दारिद्र्यात खितपत पडायचं दिवसें दिवस !" बायको नाराजीने म्हणाली.

नवरा म्हणाला - "तुझं म्हणणं पटलं मला. घिसाडघाईत काही निर्णय घेणे बरे नव्हे."

बायको स्वयंपाक करायला निघाली. चूल पेटवीत असता म्हणाली - "आज जेवणात मासे मिळाले तर काय मजा येईल नाही !" तिने असे म्हणताच मासे खाली टपकले.

तीन वरांपैकी एक मिळाला हे नवऱ्याच्या लक्षात आलं. तो बायकोला म्हणाला - "अग बावळटे, तू हे काय केलंस? एक वर तर तू फुकटच घालवलास. नुसते मासे मागण्याच्या ऐवजी 'माशांचा एक हार आपल्या गळ्यात पडावा' असा वर का नाही मागितलास ?"

दुसऱ्याच क्षणी ते सर्व मासे एका हारांत गुंफले गेले. आता बायकोच्या गळ्यात माशांचा हार चमकू लागला.

"बघा, दुसरा वर तुम्ही व्यर्थ घालवलात. आपण दोघांनी दोन वर फुकट घालवले. दोघे ही आपण चुकलो." असे म्हणत ती आपल्या गळ्यातून माशांचा हार काढू लागली. पण हार अंगाला चांगलाच चिकटून बसलेला होता. तो गळ्यातून निघतच नव्हता. नवऱ्याने खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ !

बायको रडत रडत म्हणाली - " छी:, हे काय झालं ! आपल्याला तर काहीच मिळाले नाही. आता हे मासे शिजवता ही येणार नाहीत. हा हार जर गळ्यातून निघाला नाही, तर मी आत्महत्या करीन. काय हा अपमान !"

आता लाकूडतोड्या काय करणार? एकच उपाय दिसत होता. तिसरा एक वर जो शिल्लक होता तो मागून हार गळ्यातून बाहेर काढायचा ! त्याने तिसरा वर मागितला. आता हार सहजपणे गळ्यातून बाहेर पडला. नवरा-बायकोच्या मूर्खपणामुळे मिळालेले तिन्ही वर व्यर्थ गेले !



'चांदोबा' त पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली गोष्ट